# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०४/०७/२००९ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०५) इतिवृत्त

शनिवार, दिनांक ०४ जुलै २००९ रोजी स्थायी समितीची सभा, माननीय सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ४.१५ वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला मा.प्र.आयुक्त तथा उपआयुक्त (म) श्री.उध्दव घुगे, नगर सचिव श्री.एम. ए. पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
२. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
३. श्री.जावेद हसन खान
४. श्री.गवळी रविकांत काशिनाथ
५. श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
६. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
७. श्री. कैसर खान बद्रोद्यीन खान
८. श्री. पांडे विनायक प्रभाकर
९. श्रीमती मोमीन सफिया फिरदौस
१०. श्री.सुरे सिताराम इसराम
११. श्री.सोनवणे कचरू श्रीपत
१२. श्रीमती खान मेहरून्निसा हमीद खान
१३. श्री. प्रल्हाद निमगांवकर

**विषय क्र. २३ :**

मा.आयुक्त यांचे मंजुरीनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेच्या मालकीचे सिडको एन-३ उद्यानाजवळील खुली जागा एकुण क्षेत्रफळ २३१८.९४ चौ.मी. असुन सदर जागा श्री.अशोक उजळंबकर यांनी कै.नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालय या इमारतीकरीता क्षेत्र २३१८.९४ चौ.मी. जागा भाडेतत्वावर मिळण्यासाठी विनंती अर्ज केला होता.

सिडको एन-३ येथील उद्यानाजवळील खुल्या जागेचे क्षेत्र २३१८.९४ चौ.मी. असुन त्याचे भाडे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत काढण्यात आलेले आहे. त्यानुसार भाडे रक्कम रू.२६/- प्रति चौ.मी. प्रती माह प्रमाणे एक महिन्याचे भाडे रक्कम रू.६०,२९२/- प्रमाणे प्रशासकीय मान्यता मिळाली होती. परंतु संबंधीत अर्जदार श्री.अशोक उजळंबकर यांनी कै. नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालय करीता क्षेत्र २०० चौ.मी. मिळण्याकरीता पुन्हा मा.आयुक्त यांचेकडे विनंती अर्ज केला आहे.

तरी सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे खुल्या जागेचे क्षेत्र २३१८.९४ चौ.मी. प्रमाणे रक्कम रू.२६/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे एक महिन्याचे भाडे रू.६२,२९२/- नुसार प्रशासकीय मान्यता मिळाली होती. संबंधीताने विनंती अर्ज केल्यानुसार १८६ चौ.मी. जागा मागणी केलेली आहे. अर्जदारास सदरील जागा रू.२६/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे भाडे रक्कम रू.४८३६/- प्रती माह येते.

अर्जदाराला भाडेतत्वावर जागा देणे झाल्यास मासिक भाड्याच्या बारा पट अनामत रक्कम आकारून सदरील जागा महानगरपालिकेच्या प्रचलीत अटी शर्ती नुसार प्रथम तीन वर्षांसाठी भाडेतत्वावर देण्याच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक २३ मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ७९ नुसार मंजुर करून सर्वसाधारण सभेत पाठविण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-३ येथील उद्यानाजवळील खुल्या जागेचे क्षेत्र २३१८.९४ चौ.मी. पैकी अर्जदार श्री.अशोक उजळंबकर यांना कै. नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालय करीता क्षेत्र १८६ चौ.मी. जागा रू.२६/- प्रती चौ.मी. प्रती माह प्रमाणे भाडे रक्कम रू.४८३६/- प्रती माह तसेच मासिक भाड्याच्या बारा पट अनामत रक्कम आकारून सदरील जागा महानगरपालिकेच्या प्रचलीत अटी शर्ती नुसार प्रथम तीन वर्षासाठी भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देऊन मा. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या मंजुरीनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, मौजे दिल्लीगेट येथील उप आयुक्त (सिडको) यांचे निवासस्थाना समोरील मोकळ्या मैदानात प्रशासकीय विभागा मार्फत जप्त केलेले साहित्याचा जाहीर निविदा/बोली दोन वेळेस केला असता दुसऱ्यांदा निविदा/बोली मध्ये दि.२७-२-२००९ रोजी खालील व्यक्तींनी भाग घेतला.

०१. श्री.शेख नुर शेख हबीब, नवाबपुरा, औरंगाबाद यांची लोखंडी भंगारासाठी प्रती किलो बोली रक्कम रू.१२.१०, रू.१२.५०, रू.१२.६५, रू.१२.७५, रू.१२.८५, व रू.१३.०० (अति उच्च बोली).

०२. मे.नॅशनल कुल ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद यांची लोखंडी भंगारासाठी प्रती किलो रू.१२.२०, रू.१२.४५ व अंतिम बोली रू.१२.९०.

०३. मे.सानी इंटरप्रायझेस, औरंगाबाद यांची लोखंडी भंगारासाठी प्रती किलो बोली रक्कम रू.१२.००, रू.१२.४०, रू.१२.६०, रू.१२.७० व अंतिम बोली रू.१२.८०.

त्यामधुन सर्वोच्च बोली श्री.शेख नुर शेख हबीब यांची लोखंडी भंगाराची रक्कम रू.१३.०० प्रती किलो प्रमाणे मान्य करण्यात आली होती.

लाकडी भंगारासाठी एकाच व्यक्तीने म्हणजे सानी इंटरप्रायझेस यांची बोली रक्कम रू.३.५० प्रती किलो प्रमाणे मान्य करण्यात आली होती.

सदर जागेवरील लोखंडी भंगार/लाकडी भंगार गेल्या दोन वर्षापासुन पडून आहे. सदरील भंगार देखरेख करण्यासाठी गेल्या दोन वर्षापासुन तीन सुरक्षा रक्षक ठेवण्यात आलेले असून त्यांचा पगाराचा खर्च भंगाराच्या किंमतपेक्षा जास्त होत आहे. तसेच सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे पावसामुळे भंगार खराब होण्याची व लाकडे कुजण्याची शक्यता नाकारता येत नाही.

करीता (१) श्री.शेख नुर शेख हबीब यांची लोखंडी भंगाराची रक्कम रू.१३.०० प्रती किलो व (२) सानी इंटरप्रायझेस यांनी लाकडी भंगाराची बोली रक्कम रू.३.५० प्रती किलो देणे बाबत

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी आचारसंहिता नंतर कार्यवाही करण्यासाठी आदेशीत केले होते. त्यानुसार सध्या आचारसंहिता संपल्याने सदरील ठिकाणच्या भंगारा बाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे. तरी सदरील भंगाराचे जागेवरच वजन केल्यानंतर होणाऱ्या रक्कमेचा भरणा करून घेवून भंगार साहित्य जागेवरून हलविण्याची कार्यवाही करण्यात येईल.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा. सभापती : विषय क्रमांक २४ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्लीगेट येथील उप आयुक्त (सिडको) यांचे निवासस्थाना समोरील मोकळ्या मैदानात प्रशासकीय विभागा मार्फत जप्त केलेले साहित्याचा जाहीर निविदा/बोली नुसार श्री.शेख नुर शेख हबीब यांची सर्वात जास्त बोली लोखंडी भंगारासाठी रक्कम रू.१३.०० प्रती किलो प्रमाणे तसेच लाकडी भंगारासाठी सानी इंटरप्रायझेस यांची बोली रक्कम रू.३.५० प्रती किलो प्रमाणे सर्वात जास्त बोली रक्कमेस सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

संवाद :

मा. सभापती : ऐनवेळचे प्रस्तावांना मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २५ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गोलवाडी मनपा जकात नाक्याच्या खडी रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे सा.बां.विभागाच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र.रू.५,१८,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन २००९-१० या आर्थिक वर्षात नवीन खडी रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे. सदर काम हे गोलवाडी येथील लष्कर खात्याची जागा मनपाच्या ताब्यात आली आहे. सदर जागेवर महानगरपालिकेचा जकात नाका सुरू आहे. अवजड वाहनांची गर्दी असते. सदर ठिकाणी कोणताही अपघात न होणेसाठी रस्ता करणे तातडीचे असल्यामुळे प्रस्तावित काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची-ड प्रकरण ५ नियम (२) (२) अन्वये उपलब्ध गुत्तेदार श्री.एम.ए.सिद्यीकी यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी मंजुरी देऊन मा.स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत शिफारस केलेली आहे.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गोलवाडी मनपा जकात नाक्याच्या खडी रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत अंदाजपत्रकीय र.रू.५,१८,२००/- हे काम तातडीने करून घेणे आवश्यक असल्यामुळे प्रस्तावित काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची-ड प्रकरण ५ नियम (२) (२) अन्वये उपलब्ध गुत्तेदार श्री.एम.ए.सिद्यीकी यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२४ एमआयडीसी अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. विभागाच्या सन २००७-२००८ च्या दरसूची नुसार तयार करण्यात आले असून रक्कम रूपये २५,०७,१०८/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.४४३ दि.२/३/२००९ अन्वये मान्यता प्राप्त झालेली असून सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत आठ निविदा विक्री झाल्या व

स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सात निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-टेंडरींग विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.आर.के. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा २३% कमी दराने |
| २. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ११.८९% कमी दराने |
| ३. | के.बी.पाथ्रीकर | अं.प.दरापेक्षा १९.२२% कमी दराने |
| ४. | एम. ए. सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा १८.५७% कमी दराने |
| ५. | चंद्राम एन.आशन्ना | अं.प.दरापेक्षा १२.१२% कमी दराने |
| ६. | मस्कट कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ९.९४% कमी दराने |
| ७. | राजेंद्रसिंग अजितसिंग | अं.प.दरापेक्षा १५% जास्त दराने |

अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी दराची निविदा मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची आहे. मा.आयुक्त यांनी त्यास मान्यता दिली आहे. तरी मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्रीमती सफिया मोमीन :१० वर्षानंतर पॅचवर्कचे काम सुरू केले आहे. मा.श्री.दर्डा साहेब यांचे अभिनंदन करण्यात येते.

मा.सभापती :एमआयडीसीकडुन महानगरपालिकेस कोट्यावधी रुपयांचा टॅक्स मिळतो, मालमत्ता कर, ऑक्ट्राय मिळतो. परंतु मागील १० वर्षापासून त्या भागात पॅचवर्कचे कामही झालेले नव्हते. मा.आमदार दर्डा साहेब यांनी मा.आयुक्त, मा.महापौर यांच्याशी या संदर्भात चर्चा केली होती.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : ज्यांनी पाठपुरावा केला त्या सर्वांचे व आपले आमदार दर्डा साहेब यांचे अभिनंदन करण्यात येते. एमआयडीसी कडुन ४० कोटींचे उत्पन्न महानगरपालिकेला प्राप्त होते परंतु २० टक्के सुध्दा येणारा पैसा खर्च करण्यात आलेला नाही. ज्याठिकाणाहुन उत्पन्न आहे त्याठिकाणी सुविधा उपलब्ध करून दयायला पाहिजे. सिडकोकरीता महानगरपालिकेने ६० कोटींचे प्रयोजन केले होते, १५ कोटी सिडकोला मिळालेले होते त्यातील काही रोड तयार करण्यात आले व काही तयार करण्याचे राहिले तर जो निधी वापरला तो कुठल्या रोडकरीता वापरला एमआयडीसीकरीता १० कोटी वापरयाचा होता तो कुठे वापरला. सिडकोतील सर्व मोठमोठे रोडचे डांबरीकरण करावे लागेल. सिडकोमध्ये महानगरपालिकेस आवश्य लक्ष दयावे लागेल. ज्या ठिकाणी उत्पन्नाचे स्त्रोत आहे तेथे काम करावे लागेल. अन्यथा तेथील नागरीकांचा रोष निर्माण होऊ शकतो. त्यामुळे रोडचे पॅचवर्क व डांबरीकरणाचे काम करण्यात यावे.

श्री.रविकांत गवळी :एमआयडीसीतुन महानगरपालिकेला जकातीमार्फत ४० ते ५० कोटींचे उत्पन्न होते. परंतु बऱ्याच वर्षापासून महानगरपालिकेचे सिडकोकडे दुर्लक्ष होत आहे. पॅचवर्कचे काम मा.आमदार राजेंद्रजी दर्डा, महानगरपालिकेचे अधिकारी यांनी सुरू केलेले आहे. तरी महानगरपालिकेने याकडे लक्ष दयावे व हा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती :मा.आयुक्त श्री.गुप्ता असतांना रोड डेव्हलप करण्यासाठी ५० कोटीचे लोन घेणार होते, त्यातुन एमआयडीसीसाठी १० कोटींची प्रोव्हीजन ठेवले होते. त्यायोजनेचे काय झाले. खुलासा करण्यात यावा.

अति.शहर अभियंता :सन २००७-०८मध्ये महानगरपालिकेतर्फे ६० कोटींचा रस्तेबांधणीसाठी प्रकल्प तयार केला होता, त्यातील १० कोटी चिकलठाणा एमआयडीसीतील रस्तेसांठी प्रकल्प तयार केला होता व सिडकोतील एक मुख्य रस्ता घेतला होता एमजीएम ते बळीराम हायस्कुल पर्यंत (पोलिस मेस पर्यंत) सदरचे ६० कोटी बँकेतुन कर्ज घेउन उभारयचे होते परंतु बँकेतुन लोनकरीता प्रयत्न करूनही लोन प्राप्त न झाल्याने तो प्रकल्प रद्द करण्यात आला.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :६० कोटीचे लोन मिळाले नाही म्हणुन प्रकल्प रद्द करावा लागला परंतु सिडको हस्तांतरणाच्या वेळी सिडकोकरीता १५ कोटी ठेवलेले होते त्यामध्ये सिडकोतील एकही रोड घेण्यात आला नाही आणि सिडकोमध्ये जे रोड केलेले आहे ते डिफर पेमेंटवर ज्याची काही आवश्यकता नाही तो हायवे नाही त्यावर जडवाहने जात नाही. तेवढयाखर्चात सिडकोतील सर्व रस्त्यांचे डांबरीकरण झाले असते. रोड तयार करण्यासाठी काही पर्याय नाही का महानगरपालिकेकडे.

अति.शहर अभियंता :मनपा फंडातुन तयार करू शकतो.

मा.सभापती :चालू बजेटमध्ये त्यासंदर्भात तरतुद ठेवण्यात आली आहे काय? मागच्या बजेटमध्ये तशी तरतुद ठेवण्यात आली होती का?

अति.शहर अभियंता :मागच्या बजेटमध्ये रस्त्यांचे डांबरीकरण,कॉक्रींटकरणाचे कामे केली होती.

मा.सभापती :एमआयडीसीमध्ये कामे झाली आहे काय?

अति.शहर अभियंता :मागील वर्षी एमआयडीसीमध्ये पॅचवर्कचे २५ लाखाचे काम केलेले आहे.

श्रीमती मेहरून्निसा खान:कामे कुठेकुठे केलेली आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :मागील पॅचवर्कचे काम कुठे केले तसेच पॅचवर्क झाले असेलतर एकावर्षात पुन्हा पॅचवर्क करण्याची गरज पडली आहे काय?

अति.शहर अभियंता :एमआयडीसीतील रस्ते जवळपास ३० ते ३५ कि.मी.चे आहेत. गेल्या अनेक वर्षापासुन दुरूस्ती तसेच पॅचवर्कचे काम केलेले नाही. आता २५,२५ लाख रूपये एका,एका रस्त्यांच्या पॅचवर्कमध्ये खर्च होत आहे. एमआयडीसी चिकलठाणा येथे मागील तिन वर्षापासून सतत पॅचवर्कचे काम सुरू आहे. जेवढा निधी ठेवला जातो त्यात पुर्ण काम होत नाही.

मा.सभापती :२५ लाख रूपये आता पॅचवर्कसाठी ठेवणार आहे काय?

अति.शहर अभियंता :सदरील भाग माझ्या कार्यकक्षेत येत नाही. सदरचा भाग वॉर्ड ब आणि सी मध्ये येतो.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :संबधीत अधिकाऱ्यांनी पॅचवर्क कुठे झाले ते पहावे, राहिलेल्या रस्तांचे पॅचवर्क न करता सर्व रोडची दुरूस्ती करावी लागेल. पुन:र्डांबरीकरण करावे लागेल त्यादृष्टीने पहाण्यात यावे. मी अशी विनंती करतो की, सिडकोकरीता मेन रस्त्यांसाठी बजेट तयार करा. त्यासाठी वेगळा फंड उभारण्यासाठी शासनाकडे विनंती केली जाईल. परंतु सिडकोकडे जे दुर्लक्ष झालेले आहे सिडकोकडुन जो पैसा मिळतो त्याचा विचार केला तर सिडकोचे रस्ते करणे रिडांबरीकरण करणे

अत्यंत आवश्यक आहे. त्यात एमआयडीसीचे अत्यंत आवश्यक आहे. एमआयडीसीचे शिष्टमंडळ पालकमंत्र्यांना भेटले,मा.खाजदार,मा.आमदार मा.सभापती,मा. आयुक्त यांनासुध्दा भेटले आहे. एक बैठकही बोलविण्यात आली होती. माझी अशी विनंती आहे संबधीत अधिकाऱ्यांनी मा.सभापतींना इस्टिमेट देण्यात यावे. टप्प्याटप्प्याने कामे करावी लागेल.

मा.सभापती :पॅचवर्कसाठी किती खर्च येईल. गेल्या २० वर्षापासून एमआयडीसीत काम झालेले नाही.

का.अभि.(श्री.पानझडे) : एमआयडीसीमध्ये २५ लाखाचे पॅचवर्कसाठी ठेवले होते ते अतिशय जुजबी खर्च आहे. एमआयडीसीतील रस्ते अतिशय खराब झालेले आहे त्याबाबतीत सविस्तर अंदाजपत्रक तयार करावे लागेल. एमआयडीसीतील पॅचवर्कसाठी साधारणत:दिड कोटी रूपये लागतील.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :एमआयडीसीतील भुखंड हस्तांतरण करता वेळी एमआयडीसी शुल्क आकारते. सिडको जशी ट्रान्सफरसाठी आकारणी करते त्याच प्रमाणे एमआयडीसीही घेते. एमआयडीसीने जे शुल्क जमा केलेले आहे त्याचीही माहिती काढण्यात यावी. एमआयडीसीला एक पत्र पाठविण्यात यावे की, जो पैसा तुम्ही घेतात त्याच्यातुन रस्ते करण्याकरीता १५ ते २० कोटी रूपये देण्यात यावे.

श्री.प्रशांत देसरडा :एमआयडीसीतील रोड आपण पॅचवर्क करून समाधान करीत आहोत. महानगरपालिकेतील जकातीचे ४० टक्के उत्पन्न हे चिकलठाणा एमआयडीसीतुन येते. परंतु महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट आहे व रस्ते विकास होणार नाही हे एमआयडीसीच्या पदाधिकाऱ्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना एक निवेदन दिले कि, आमची एमआयडीसी सेल्फ डेव्हलपमेंट साठी आम्हाला दया त्याबाबतीत एक पत्र महानगरपालिकेला आले की, महानगरपालिकेची भुमिका काय आहे. त्यावेळी सर्व नगरसेवक,पदधिकारी यांच्या मनात शंका आली की, जकातीचे ४० टक्के रक्कम मिळणार की नाही. काही अधिकारी एमआयडीसी ची हद्दी कुठली याची माहिती घेत होते. जसे मार्केट कमिटीमध्ये एक मॉडल तयार झाले की, मार्केट कमिटीने एनओसी दिली की, नविन मार्केट कमिटी निर्माण होउ शकते. एमआयडीसीत जर सुविधा दिली नाही तर अधिकार एमआयडीसीतील तिथल्या भुखंड धारकांना असेल त्यामुळे प्रश्न असा उद्‌भवेल की, तेथील मालमत्ता टॅक्स महानगरपालिकेला मिळणार नाही. त्यामुळे अशी विनंती करतो की, एमआयडीसीतील सर्व रोड डांबरीकरण करायचे असेल तर १० कोटी रूपये लागतील. आत्ताचे मुख्यमंत्री ज्यावेळी उद्यागमंत्री होते त्यांना याबाबतीत शिष्टमंडळ भेटले होते. त्यासाठी आपण १० कोटी रूपये जसे सिडकोसाठी विशेष निधी मागतो तसे शासनाला एमआयडीसाठी वेगळे अशे १० कोटी रूपये देण्यात यावे. अशाप्रकारचे एक पत्र व ठराव तयार करण्यात यावा. मा.मुख्यमंत्र्यांना चिकलठाणा एमआयडीसीच्या प्रश्नांबाबत जाणीव आहे. दुसरा असा ठराव घेण्यात यावा की, चिकलठाणा एमआयडीसीमध्ये कुणीही येवून निवासी भुखंड आणि लेआउट धारण करतात आणि तेथील रोजगार हा

चाललेला आहे त्यामुळे असा ठराव करावा की, निवासी उपयोगीकरीता एमआयडीसी देवू नये आणि तिथे उद्योगच उभारण्यात यावे जेणे करून शहरात जी बेकारी निर्माण झाली आहे ती निर्माण होणार नाही., निवासीसाठी एनओसी देण्यात येवू नये म्हणून मा.मुख्यमंत्र्याना पत्र देण्यात यावे,

मा.सभापती :प्रशासनाने एमआयडीसी रस्त्यांच्या पॅचवर्कसाठी दिड कोटी रूपयांचा निधी ठेवण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा :प्रशासनाचे अभिनंदन करण्यात येते की, आजच्या प्रस्तावामध्ये पॅचवर्कसाठी कमी दराने रेट आलेले आहे.

मा.सभापती : तब्बल १० वर्षानंतर एमआयडीसी चिकलठाणा एरियाचे पॅचवर्कच्या कामाचा शुभारंभ झाला. आणि २५ लाख रूपये खर्च करून आज कामही सुरू झाले आहे आणि संपूर्ण एमआयडीसी रस्त्यांचे पॅचवर्क करण्यासाठी सध्याच्या बजेटमध्ये दिड कोटींची स्थायी समिती तरतुद करणार आहे. त्याचे इस्टिमेट तयार करून काम तात्काळ सुरू करावे आणि एमआयडीसीचे पॅचवर्कचे काम सुरू झाले त्यासाठी सर्वांनीच प्रयत्न केले. यासाठी स.स.श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर, श्री.प्रशांत देसरडा, श्री.सतिष कटकटे यांनी सांगीतल्यानुसार मा.आमदार श्री.राजेंद्र दर्डा, मा.महापौर या सर्वांचे अनुमोदनाने अभिनंदन करण्यात येते. ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येतो. तसेच ५० कोटीची कर्ज घेवून एमआयडीसीचे पावसाळयानंतर रस्ते नविन तयार करण्यात यावे. तसेच प्रशासनाने १.५० कोटी पॅचवर्कसाठी मागावे आणि दुसरे असेही शासनास पाठविण्यात यावे की, एमआयडीसी भागात निवास वापरास मान्यता देण्यात येवू नये आणि महाराष्ट्र शासनाने एमआयडीसीचे रस्ते विकासाकरीता १२ कोटी रूपये महानगरपालिकेस देण्यास शासनास मागणी करावी. वरील दुरूस्तीसह विषय क्र.२६ मंजुर करण्यात येत आहे.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२४ एमआयडीसी अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी दराची मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच सभागृहात सन्माननीय सदस्यांनी केलेल्या चर्चेप्रमाणे तसेच १० वर्षानंतर एमआयडीसी भागातील पॅचवर्कच्या कामाचा शुभारंभ होऊन आज कामही सुरू झाले आहे. सदर काम सुरू करण्यासाठी प्रयत्न केल्यामुळे मा.आमदार श्री.राजेंद्र दर्डा व मा.महापौर व ज्यांनी प्रयत्न केले त्या सर्वांचे अभिनंदन करण्यात येते आणि संपूर्ण एमआयडीसी रस्त्यांचे पॅचवर्क करण्यासाठी अर्थसंकल्पात १.५० कोटींची तरतुद स्थायी समिती करणार आहे. यासंबंधी योग्य ती कार्यवाही करणेस मंजुरी देण्यात येते.

५० कोटीची कर्ज घेवून एमआयडीसीचे पावसाळयानंतर रस्ते नविन तयार करण्याची तसेच एमआयडीसी भागात निवास वापरास मान्यता देण्यात येवू नये आणि महाराष्ट्र शासनाने एमआयडीसीचे रस्ते विकासाकरीता १२ कोटी रूपये शासनाच्या स्तरावर महानगरपालिकेस उपलबध करून देण्यासाठी प्रशासनाने शासनाकडे मागणी करावी. असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७ :**

कार्यकारी अभियंता, वॉर्ड ब आणि क यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.२ मयुरपार्क येथे १२ मी. रूंद डी.पी. रस्त्याचे डांबरीकण करणे या कामाचे अंदाजपत्रक र.रू.९,९९,४००/- दि.३१.१.२००९ रोजी मा.शहर अभियंता यांची मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदा सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्द केली असता एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | राजेंद्रसिंग अजितसिंग | अं.प.दरापेक्षा ७.५% जास्त दराने |
| २. | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा १२.१% जास्त दराने |
| ३. | एम. ए. सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा १२.८६% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५% जास्त दराची निविदा राजेंद्रसिंग अजितसिंग यांची असुन सदर निविदेस मा.शहर अभियंता यांची मान्यता दि.१९/६/२००९ असुन सदर निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५% जास्त असल्याने कामासाठी वाढीव खर्च ७४,९५५/- इतका होत आहे. तरी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा ७.५% जास्त दराची राजेंद्रसिंग अजितसिंग यांची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२ मयुरपार्क येथे १२ मी. रूंद डी.पी. रस्त्याचे डांबरीकण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५% जास्त दराची राजेंद्रसिंग अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड इ व फ) महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.८२ अंतर्गत पारीजातनगर, मुकुंदवाडी रेल्वेस्टेशन जवळ राजमाता जिजाई हौ.सोसायटी येथे ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी सन २००६-०७ चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रू.१४,७७,६१४/- मा.स्थायी समिती ठराव क्र.४७२ दि.२५.३.२००८ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र.५१/०९ दिनांक १६.२.०९ अन्वये ई-निविदा मार्फत निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदा मध्ये मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.८६% कमी दर असलेली निविदा मंजुरी प्राप्त असुन त्यास मा.आयुक्त यांनी दि.७/३/०९ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सबब तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १२.८६% कमी दराची मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८२ अंतर्गत पारीजातनगर, मुकुंदवाडी रेल्वेस्टेशन जवळ राजमाता जिजाई हौ.सोसायटी येथे ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १२.८६% कमी दराची मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र. ५९ मधील श्रीनिकेतन कॉलनी  मध्ये श्री.गंगापुरवाला यांच्या घरासमोर रस्त्यालगत ३०० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्त करण्याचे कामासाठी अंदाजपत्रक सा.बां. दरसुची सन २००८-०९ नुसार रक्कम

रू.४,९०,०००/- चे तयार करण्यात आले आहे. या कामाचा खर्च वर्ष २००९-१० देखभाल दुरूस्ती (लेखा अनुदान) या लेखा शिर्षकातुन करण्यात येत आहे.

करीता स्थायी समितीमध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम (२) (२) अंतर्गत मंजुरीकरीता प्रस्ताव सादर करण्यात येत असून मा.आयुक्तांनी शिफारस करून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत आदेशीत केले आहे.

त्यानुसार उपरोक्त रक्कम रू.४,९०,०००/- चे काम मु. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम (२) (२) अंतर्गत उपलब्ध एजन्सीमार्फत करून घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ५९ मधील श्रीनिकेतन कॉलनी मध्ये श्री.गंगापुरवाला यांच्या घरासमोर रस्त्यालगत ३०० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे व दुरूस्त करण्याचे अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,९०,०००/- चे काम तातडीने करून घेणे आवश्यक असल्यामुळे मु. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम (२) (२) अंतर्गत उपलब्ध एजन्सीमार्फत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३० :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड- ब व क) प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजने अंतर्गत नवीन समांतर पाणी पुरवठा योजनेचे संकल्पन व नियोजन सन २००५ मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेने केले. या कामासाठी वर्ष २००५-०६ मध्ये रक्कम रूपये ३५९.६७ कोटी रकमेचा प्रस्ताव, सविस्तर प्रकल्प अहवालासह केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT योजनेअंतर्गत मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता. राज्यस्तरीय मंजूर समितीच्या दिनांक २८/९/२००६ व दिनांक ४/५/२००७ रोजीच्या अनुक्रमे दुसऱ्या व चौथ्या बैठकांमध्ये प्रस्तावाचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले होते. परंतु प्रस्तावास त्यावेळी समितीने मान्यता प्रदान केली नाही. महानगरपालिकेतर्फे मा. केंद्र व राज्य शासन स्तरावर समांतर जलवाहिनीच्या प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठी वेळोवेळी पत्रव्यवहार व प्रत्यक्ष भेटीही देण्यात आल्या होत्या.

महानगरपालिकेने समांतर पाणीपुरवठा योजनेचा रूपये ३५९.६७ कोटीचा प्रस्ताव सादर केला तेव्हा वर्ष २००५-०६ ची तत्कालीन दर सुची वापरण्यात आली होती. जुलै २००८ पर्यंत शासनाने समांतर जलवाहिनीच्या प्रस्तावास मान्यता न दिल्याने व बाजारात साहित्याचे दर वाढल्याने सुधारीत आराखडे व प्रस्ताव तयार करून शासनाकडे पुन्हा मंजुरीस्तव सादर करण्यासाठी युनीटी कन्सल्टंट प्रा.लि. पुणे यांची प्रकल्प व्यवस्थापन संकल्पनार्थी म्हणुन मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.२६६ दिनांक २०.८.२००८ अन्वये नेमणूक केली आहे. त्यानुसार टप्पा १ अंतर्गत जायकवाडी पासुन नक्षत्रवाडी संतुलन टाकी पर्यंत नवीन समांतर जलवाहिनी टाकणे व तदनुषंगीक कामे करणे इत्यादी कामासाठी रक्कम रूपये ४९४.६८ कोटीचा सुधारीत प्रस्ताव संबंधित सल्लागारामार्फत तयार करून घेण्यात आला. दिनांक २५.२.२००९ रोजी मा.मंत्री, जलसंपदा, लाभक्षेत्र विकास तथा पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांनी मुंबई येथे या संदर्भाने आयोजीत केलेल्या बैठकीमध्ये औरंगाबाद शहर नवीन समांतर पाणी पुरवठा योजनेच्या सुधारीत प्रस्तावावर व टप्पा २ अंतर्गत करावयाच्या वितरण व्यवस्था बळकटीकरण कामा संदर्भाने सविस्तर चर्चा झाली. या सुधारीत प्रस्तावास मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, मुंबई यांनी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. दरम्यान केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT योजने अंतर्गत औरंगाबाद शहर नवीन समांतर पाणी पुरवठा योजनेच्या मंजुरीबाबत मा.संचालक, नगर परिषद संचालनालय, मुंबई या कार्यालयाचे

दिनांक २०.६.२००९ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. दिनांक ४.५.२००७ रोजी संपन्न झालेल्या चौथ्या राज्यस्तरीय मंजुर समिती मध्ये रक्कम रूपये ३५९.६७ कोटीच्या प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्याचे तसेच केंद्र शासनाने रक्कम रूपये १४३.८६ कोटीचा पहिला हप्ता वितरीत केल्याचे शासनाने महानगरपालिकेस कळविलेले आहे. या योजने अंतर्गत करावयाच्या अनिवार्य आणि ऐच्छिक सुधारणांकरीता केंद्र शासनाशी करारनामा करण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे घेऊन मुंबई कार्यालयात यावे असेही सदर पत्रात नमूद आहे. त्याचप्रमाणे या योजनेची निविदा प्रक्रिया ऑगस्ट महिना अखेर पुर्ण करावी अशा सुचना मा.संचालक, नगर परिषद संचालनालय, मुंबई यांनी दुरध्वनीवरून दिल्या आहेत.

सन २००५-०६ पासुन आजपर्यंत साधारणतः तीन वर्षाचा कालावधी सदर योजना मंजुर होण्यासाठी लागला आहे. दिनांक २०/०८/२००८ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.२६६ अन्वये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास शासनाकडून प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावरच सविस्तर प्रकल्प अहवाल किंमतीच्या 2.35% +Service Tax (At actual and as applicable from time to time as per Central Govt. norms which are 12.36% at present for the year 2008-09) किंवा केंद्र शासन सल्लागार फी मंजुर करेल ती रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम याप्रमाणे सल्लागाराची फी अदा करावी अशी मान्यता आहे. या नुसार UIDSSMT योजने अंतर्गत मंजूर झालेल्या रूपये ३५९.६७ कोटी किंमतीच्या समांतर जलवाहिनी योजनेची पुढील सर्व कामे तसेच शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेशी संबंधीत वेळोवेळी करावयाची भविष्यातील कामे संबंधित प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार युनीटी कन्सल्टंट प्रा.लि., पुणे यांचेकडून करून घेण्यासाठी करारनामा (संविदा) करणेस मुं.प्रां.महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३, खंड (क) व अनुसूची-ड चे प्रकरण ५ मधील नियम (२) (२) अन्वये मंजुरी मिळणेकरीताचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक २०/०८/२००८ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.२६६ अन्वये युनीटी कन्सल्टंट प्रा.लि., पुणे यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमण्यास तसेच संबंधीत सल्लागारास शासनाकडुन प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावरच सविस्तर प्रकल्प अहवाल किंमतीच्या 2.35% +Service Tax (At actual and as applicable from time to time as per Central Govt. norms which are 12.36% at present for the year 2008-09) किंवा केंद्र शासन सल्लागार फी मंजुर करेल ती रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम याप्रमाणे सल्लागाराची फी अदा करावी अशी मान्यता आहे. त्यानुसार UIDSSMT योजने अंतर्गत मंजूर झालेल्या रूपये ३५९.६७ कोटी किंमतीच्या समांतर जलवाहिनी योजनेची पुढील सर्व कामे तसेच शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेशी संबंधीत वेळोवेळी करावयाची भविष्यातील कामे संबंधित प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार युनीटी कन्सल्टंट प्रा.लि., पुणे यांचेकडून करून घेण्यासाठी करारनामा (संविदा) करणेस मुं.प्रां.महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३, खंड (क) व अनुसूची-ड चे प्रकरण ५ मधील नियम (२) (२) अन्वये मान्यता देण्यात येते.

तसेच स्थायी समिती सभा ठराव क्र.२१० दिनांक १३/२/२००९ अन्वये नक्षत्रवाडी संतुलीत जलकुंभ ते शहरापर्यंतच्या जुन्या पी.एस.सी. जलवाहिन्या बदलण्यासाठी नविन एम.एस.जलवाहिनी टाकणे, शहरात आवश्यक ठिकाणी Transmission Mains टाकणे व तद्नुषंगीक कामे करणे या कामासाठी युनीटी कन्सल्टंट प्रा.लि., पुणे यांची प्रकल्पाच्या किंमतीच्या ५% दराने प्रकल्प सल्लागार

म्हणून नेमणूक केलेली आहे. सल्लागाराची फी म्हणून प्रकल्पाच्या किंमतीच्या ५% दराऐवजी 2.35% +Service Tax (At actual and as applicable from time to time as per Central Govt. norms which are 12.36% at present for the year 2008-09) अशी दुरूस्ती करून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन युनीटी कन्सल्टंट प्रा.लि., पुणे यांचेशी करारनामा (संविदा) करणेस मुं.प्रां.महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३, खंड (क) व अनुसूची-ड चे प्रकरण ५ मधील नियम (२) (२) अन्वये मान्यता देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड- ब व क) प्रस्ताव सादर करीत आहेत की, मराठवाडा विकास कार्यक्रम २००८ अंतर्गत महाराष्ट्र शासनाने औरंगाबाद शहरातील वितरण व्यवस्थेचे Re-Engineering करून Hydraulic Model तयार करणे, आवश्यक त्या भागातील वितरण व्यवस्था बदलणे व तद्नुषंगीक कामे करणे करीता रूपये ३० कोटी मंजुर केले आहेत. त्यानुसार सदर काम करणेसाठी मा.सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.३०० दिनांक २०/९/२००८ अन्वये मान्यता झालेली आहे.

रूपये ३० कोटी रक्कमेच्या कामास सर्व प्रकारचे प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सहाय्य करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही शासनाची संस्था तयार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई कार्यालयाचे दिनांक ३० मे २००९ रोजी या संदर्भाने पत्र प्राप्त झालेले आहे.

रूपये ३० कोटीच्या योजनेमध्ये प्रस्तावित कामाची व्याप्ती खालीलप्रमाणे राहील.

अ) औरंगाबाद शहर संपुर्ण वितरण व्यवस्था सुधारणे अंतर्गत-

१. औरंगाबाद शहराचे उपग्रहीय नकाशे/छायाचित्र तयार करणे.
२. उपग्रहीय नकाशे/छायाचित्राचे Digitized Maps तयार करणे.
३. वितरण व्यवस्थेचे नकाशे तयार करणे.
४. Digitized नकाशांवर वितरण व्यवस्थेचे नकाशे Super Impose करणे.
५. विविध स्तरांचे (Layers) GIS maps तयार करणे.
६. वितरण व्यवस्थेचे Re-Engineering करणे करीता आवश्यक ती सर्व कामे (उदा. सर्व्हे इ.) करून वितरण व्यवस्थेचे Hydraulic Model तयार करणे.

ब) उपरोक्त प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अभ्यास करून साधारणत: शहराच्या ३५ ते ४०% भागातील जास्त जुन्या, जास्त गळत्या असलेल्या तसेच पाणी कमी मिळत असलेल्या भागातील वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी रूपये ३० कोटी रकमेच्या मर्यादेपर्यंत कामाचे संकल्पन करून सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे, शासनाची प्रशासकीय मान्यता घेणे, निविदा दस्तावेज तयार करणे, निविदा कार्यवाही पुर्ण करणे, योजनेच्या कार्यन्वयन कालावधीत कामावर देखरेख करणे, गुणवत्ता नियंत्रण करणे.

मजिप्रा परिपत्रक क्र.१२६ दिनांक ३/४/२००८ च्या परिपत्रकाप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडून प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सेवा घेऊन इ. अँड पी. चार्जेस देण्यास तसेच संपूर्ण शहराचे Hydraulic Model तयार करणे व तद्नुषंगीक बाबींसाठी वेगळे रूपये ५० लक्ष मजीप्रा कडे सेवा चार्जेस म्हणुन देण्यास विषय क्र.५०७ दिनांक २३/६/२००९ अन्वये मा.सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता झाली आहे.

या मान्यतेनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडुन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन सेवा घेण्याचा तसेच त्यांचेशी करारनामा (संविदा) करणेस मुं.प्रां.महानगरपालिका अधिनियम

१९४९ चे कलम ७३, खंड (क) व अनुसूची-ड चे प्रकरण ५ मधील नियम (२) (२) अन्वये परवानगी मिळणेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक २३/६/२००९ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.५०७ अन्वये रूपये ३० कोटीच्या योजनेमध्ये प्रस्तावित कामांसाठी मजिप्रा परिपत्रक क्र.१२६ दिनांक ३/४/२००८ च्या परिपत्रका प्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडून प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सेवा घेऊन इ. अँड पी. चार्जेस देण्यास तसेच संपुर्ण शहराचे Hydraulic Model तयार करणे व तद्नुषंगीक बाबींसाठी वेगळे रूपये ५० लक्ष मजिप्राकडे सेवा चार्जेस म्हणुन देण्यास मान्यता झालेली आहे.

या मान्यतेनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडुन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन सेवा घेण्यास व त्यांचेशी करारनामा (संविदा) करणेस मुं.प्रां.महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३, खंड (क) व अनुसूची-ड चे प्रकरण ५ मधील नियम (२) (२) अन्वये मान्यता देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मंजुरीनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, खालील प्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीचे सभागृह, इमारती व दुकान भाडेतत्वावर देणे आवश्यक आहे. दिनांक २-६-२००९ रोजी मा.स्थायी समिती सभेत सदरील प्रस्ताव ठेवण्यात आला असता हॉलचे भाडे जास्त असल्यामुळे फेर सादर करणे बाबत निर्देशीत करण्यात आले होते.

त्यानुसार दिनांक ११-६-२००९ रोजी भाडे समितीची बैठक आयोजीत करण्यात आली होती. मालमत्ता अधिकारी यांनी निर्देशनास आणून दिले आहे की, या मालमत्ता विभागातर्फे वेळोवेळी निविदा काढुन ही नागरीकांकडुन आवश्यक प्रतिसाद मिळत नाही व काही व्यापारी संकुले मालमत्ता विभागाच्या ताब्यात आल्यापासून त्यामधील काही गाळे महिनोमहिने रिक्त राहुन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते. तसेच स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरातपोटी आगाऊ खर्च होतो. त्यामुळे मुख्य लेखा परीक्षक यांनी काही प्रमाणात भाडे कमी करून त्यास प्रतिसाद मिळेल, जेणे करून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही, असे सूचविले. त्यानुसार महानगरपालिकेच्या मालकीचे ज्या-ज्या ठिकाणी हॉल व दुकाने आहेत त्या परिसरातील खाजगी व्यक्तींनी हॉल / दुकाने किती प्रती माह भाडयाने दिलेले आहेत, याची शहानिशा करून व तुलना करून हॉल व दुकाने भाडयाने देण्यात यावे, कार्यकारी अभियंता, वॉर्ड कार्यालय अ व ड, ब व क, इ व फ यांनी सूचविले व यावर सर्वांनी सहमती दिली आणि त्यानुसार फेर आकारणी करून सादर करण्याचे सर्वानुमते ठरले.

त्यानुसार दिनांक १६-१-२००७ रोजी मा.स्थायी समिती मध्ये विषय क्र.२०७ नुसार प्रती माह भाडे रू.१०००/-, अनामत रक्कम रू.१२,०००/-, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी.प्रती माह व अकृषी कर रक्कम रू.७.६८/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष प्रमाणे भाडयाने देणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे.

**०१. महानगरपालिकेच्या मालकीचे मो.अल्तमश कॉलनी येथील सभागृह भाडयाने देणे बाबत :-**

महानगरपालिकेच्या मालकीचे मो.अल्तमश कॉलनी येथील सभागृह भाडेपट्टयाने मिळणे बाबत श्री.सय्यद मोईनोद्दीन इनामदार, जिल्हा अध्यक्ष, भ्रष्टाचार व अत्याचार विरोधी समिती, औरंगाबाद

यांनी दिनांक १९-११-२००७, २८-१२-२००७, ३-४-२००८ व ४-१२-२००८ रोजी विनंती अर्ज दिलेला आहे.

त्यानुसार संबंधितास सदरील ठिकाणचा हॉल भाडेपट्टयावर देणेसाठी तत्कालीन मा.आयुक्त यांची मान्यता झालेली आहे. सदरील ठिकाणचे खुल्या जागेचे क्षेत्रफळ ६५२ चौ.मी. असून हॉलचे क्षेत्रफळ ८४ चौ.मी. करीता प्रती माह भाडे रू.१०००/-, अनामत रक्कम रू.१२,०००/-, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी.प्रती माह व अकृषी कर रक्कम रू.७.६८/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष प्रमाणे भाडयाने देणे योग्य.

**०२. पुडंलिकनगर येथील आरोग्य केंद्रासाठी खाजगी व्यक्तीकडुन जागा भाडयाने घेणे बाबत :-**

एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, महानगरपालिका, औरंगाबाद तर्फे पुंडलिकनगर येथील आरोग्य केंद्र सुरू करणेसाठी खाजगी व्यक्ती श्री.संजय पिता माणिकराव सरोवर, यांची मिळकत सर्व्हे नं.१६/२ पार्ट मधील प्लॉट क्र.४८ व ४९ क्षेत्रफळ १६७ चौ.मी. पैकी १२५.४ एवढया जागेस रक्कम रू.७९/- प्रती चौ.मी. भाडे आकारणीस कार्यकारी अभियंता, वॉर्ड कार्यालय इ व फ, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी निश्चित केले आहे. त्यानुसार रू.१,१८,८७९/- प्रती वर्ष नुसार भाडयाने घेणे योग्य.

**०३. मो.शहागंज भाजीमंडी येथील दुकान क्र.९६ भाडेतत्वावर देणे बाबत :-**

महानगरपालिकेच्या मालकीचे मो.शहागंज भाजीमंडी येथील दुकान क्र.९६ रिक्त आहे. सदरील दुकानाचे क्षेत्रफळ १६ चौ.मी. असून शिध्द शिघ्र गणकानुसार भाडे रक्कम रू.५९/- प्रती चौ.मी. प्रती माह भाडे आकारणीस कार्यकारी अभियंता, वॉर्ड कार्यालय ब व क, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी निश्चित केले आहे. त्यानुसार रू.११,३२८/- प्रती वर्ष व अनामत रक्कम रू.६१०/- प्रती चौ.मी. प्रमाणे रू.९७६०/- आकारून निविदा काढणे योग्य.

**०४. भारतनगर क्र.१ शाळेसाठी इमारत भाडेतत्वावर घेणे बाबत :-**

शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद तर्फे भारतनगर क्र.१ येथे महानगरपालिकेने श्री.बाळासाहेब झगरे यांची इमारत घेतली होती. परंतु वाढत्या विद्यार्थ्यांची संख्या पाहता सदरील इमारत अपूरी पडत असल्याने त्याऐवजी खाजगी व्यक्ती श्री.जयस्वाल शामलाल मोतीलाल, प्लॉट नं.३० व ३१, भारतनगर येथे स्थलांतरीत करण्यात आलेली आहे. सदरील मनपाच्या प्राथमिक शाळेकरीता क्षेत्रफळ ९८.५ चौ.मी.करीता शिध्द शिघ्र गणकानुसार रू.५७/- प्रती चौ.मी. प्रती माह भाडे आकारणीस कार्यकारी अभियंता, वॉर्ड कार्यालय इ व फ, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी निश्चित केले आहे. त्यानुसार रू.६७,३७४/- प्रती वर्ष भाडयाने घेणे योग्य.

**०५. मो.शहागंज येथील जागा भाडेतत्वावर देणे बाबत :-**

मो.शहागंज येथील भाजीमंडी मधील पर्यायी जागा मिळणे बाबत श्री.मोहम्मद इब्राहिम मो.युसूफ, यांनी दिनांक ६-१०-२००८, २६-९-२००८ रोजी अर्ज दिलेला होता. सदरील जागेचे क्षेत्रफळ २.३ चौ.मी. करीता प्रती माह भाडे रू.१०००/-, अनामत रक्कम रू.१२,०००/-, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी.प्रती माह व अकृषी कर रक्कम रू.७.६८/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष प्रमाणे भाडयाने देणे योग्य.

**०६. नभुक्र.६७२९ मो.लोटाकारंजा येथील मटनमार्केट भाडयाने देणे बाबत :-**

महानगरपालिकेच्या मालकीचे मो.लोटाकारंजा नभुक्र.६७२९ येथील मटनमार्केट ज्याचे क्षेत्रफळ १४०.९५ चौ.मी. असून रू.११०/- प्रती चौ.मी.प्रती माह भाडे आकारणी कार्यकारी अभियंता, वॉर्ड कार्यालय अ व ड, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी निश्चित केले आहे. त्यानुसार निविदा काढणे योग्य.

**०७. मिर सलामी व्यापारी संकुलातील दुकान क्र.एस-१, एस-२ भाडयाने देणे बाबत :-**

श्री.शेख रईस शेख महेबुब, रा.सब्जीमंडी औरंगाबाद यांचे पैठणगेट येथील याबा ॲटो गॅरेज या नावाचे दुकान रस्ता रूंदीकरणामध्ये महानगरपालिकेने त्यांच्या दुकानाची जागा ताब्यात घेतल्यामुळे त्यांना पर्यायी जागा म्हणुन सादिया टॉकीज मागील व्यापारी संकुलातील दुकान क्र.एस-१ व एस-२ ही दुकाने देणे बाबत यापूर्वी दिनांक ७-१-२००९ रोजी मा.स्थायी समिती सभेने विषय क्र.१७२ अन्वये प्रस्ताव (३) मंजुर केलेला आहे. त्यानुसार दुकान क्र. एस-१ ज्याचे क्षेत्रफळ १३.४८ चौ.मी.करीता रक्कम रू.७९/- प्रती चौ.मी. प्रती माह व एस-२ ह्या दुकानाचे क्षेत्रफळ १३.४८ चौ.मी.करीता रू.७९/- प्रती चौ.मी.प्रती माह भाडे आकारणेस कार्यकारी अभियंता, वॉर्ड कार्यालय अ व ड, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी निश्चित केले आहे. त्यानुसार एस-१ या दुकानाचे प्रती वर्ष भाडे रू.१२,७७९/- व एस.-२ करीता प्रती वर्ष भाडे रू.१२,७७९/- आकारणेचे ठरविले होते. परंतु सदरील इमारत बऱ्याच दिवसापासून रिक्त असल्याने व भाडे समितीमध्ये झालेल्या चर्चे अंती मासिक भाडयाच्या ५० टक्के म्हणजे (एन.एस.१ व एन.एस.२ साठी प्रत्येकी रू.४७५२/- प्रती वर्ष) रू.४७५२/- प्रती वर्ष भाडे व अनामत रक्कम हे मासिक भाडयाच्या बारापट, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह व अकृषी कर रू.७.६८/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष भरणा करून व करारनामा करून भाडेपट्टयाने देणे योग्य.

**०८. मिर सलामी व्यापारी संकुलातील तळमजला पर्ल एज्युकेशन ॲण्ड सोसायटी यांना दिर्घ मुदतीच्या लिजवर देणे बाबत :-**

श्री.सोहेल अहमद, अध्यक्ष, पर्ल एज्युकेशन ॲण्ड सोसायटी यांनी मिर सलामी व्यापारी संकुलातील तळमजला दिर्घमुदतीवर भाडेपट्टयाने मिळणे बाबत विनंती अर्ज केला आहे. त्यानुसार सदरील तळमजल्याचे क्षेत्रफळ १०६५.२ चौ.मी. असून त्याचे रक्कम रू.७९/- प्रती चौ.मी.प्रती माह नुसार रक्कम रू.८४,१५१/- प्रती माह भाडे आकारणी कार्यकारी अभियंता, वॉर्ड कार्यालय अ व ड, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी निश्चित केले आहे.

परंतु पावसाळयात सदरील ठिकाणी पाणी साचत असल्यामुळे व भाडे समिती मध्ये चर्चे अंती ठरल्याप्रमाणे रू.८४,१५१/- आकारले होते. आजु बाजुच्या खाजगी दुकानाचे दरानुसार रू.२२,०००/- प्रती माह भाडे व अनामत रक्कम हे मासिक भाडयाच्या बारापट, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह व अकृषी कर रू.७.६८/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष भरणा करून व करारनामा करून भाडेपट्टयाने देणे योग्य.

**०९. संत भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ, यांना चिकलठाणा येथील जुने झोन कार्यालय क्र.५ च्या उजव्या बाजुची जागा भाडयाने देणे बाबत :-**

अध्यक्ष, श्री.मदन राघोजी ढाकणे, संत भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक १४-१-२००९ रोजी अर्ज देवुन महानगरपालिकेच्या मालकीचे चिकलठाणा येथील जुने झोन कार्यालय क्र.५ च्या इमारतीमधील उजव्या बाजुची जागा भाडयाने मिळणे बाबत विनंती अर्ज केला आहे.

त्यानुसार सदर ठिकाणच्या मागणी केलेल्या जागेचे क्षेत्रफळ ८८ चौ.मी. असून रक्कम रू.१०८/- प्रती चौ.मी.प्रती माह शिध्द शिघ्र गणका प्रमाणे रू.९५०४/- मासिक भाडे ठरविण्यात आले होते. परंतु सदरील इमारत बऱ्याच दिवसापासून रिक्त असल्याने व भाडे समितीमध्ये झालेल्या चर्चे अंती भाडयात दुरूस्ती करून म्हणजे आजु बाजुच्या परिसरातील भाडे गृहीत धरून रू.२२००/- प्रती माह भाडे व अनामत रक्कम हे मासिक भाडयाच्या बारापट, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह

व अकृषी कर रू.७.६८/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष भरणा करून व करारनामा करून भाडेपट्टयाने देणे योग्य.

**१०. बॉडी केअर हेल्थ कल्ब, औरंगाबाद यांना चिकलठाणा येथील जुने झोन कार्यालय क्र.५ च्या डाव्या बाजुची जागा भाडयाने देणे बाबत :-**

संचालक, श्री.बाबासाहेब मनोहर दहीहंडे, बॉडी केअर हेल्थ कल्ब, चिकलठाणा, औरंगाबाद यांनी दिनांक १७-२-२००९ रोजी अर्ज देवुन महानगरपालिकेच्या मालकीचे चिकलठाणा येथील जुने झोन कार्यालय क्र.५ च्या इमारतीमधील उजव्या बाजुची जागा भाडयाने मिळणे बाबत विनंती अर्ज केला आहे. त्यानुसार सदर ठिकाणच्या मागणी केलेल्या जागेचे क्षेत्रफळ ८८ चौ.मी. असून रू.१०८/- प्रती चौ.मी. प्रती माह शिध्द शिघ्र गणका प्रमाणे रू.९५०४/- मासिक भाडे ठरविण्यात आले होते. परंतु सदरील इमारत बऱ्याच दिवसापासून रिक्त असल्याने व भाडे समितीमध्ये झालेल्या चर्चे अंती भाडयात दुरूस्ती करून म्हणजे आजु बाजुच्या परिसरातील भाडे गृहीत धरून रू.२२००/- प्रती माह व अनामत रक्कम हे मासिक भाडयाच्या बारापट, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह व अकृषी कर रू.७.६८/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष भरणा करून व करारनामा करून भाडेपट्टयाने देणे योग्य.

**११. भारतनगर येथील खाजगी व्यक्तीची मिळकत मनपा शाळेसाठी भाडेतत्वावर घेणे बाबत :-**

भारतनगर येथील व्यक्ती श्री.संतोष दगडु वाघमारे, यांची मिळकत ज्याचे क्षेत्रफळ ७७.७७ चौ.मी.ची जागा मनपा शाळेसाठी भाडेतत्वावर घेणे बाबत शिक्षणधिकारी यांनी भाडे निश्चित करणेसाठी संचिका मालमत्ता विभागाकडे पाठविलेली आहे. त्यानुसार सदरील जागेचे प्रती चौ.मी. प्रती माह भाडे रू.६६/- प्रमाणे रू.५१३३/- प्रती माह नुसार भाडेपट्टयाने घेणे योग्य.

**१२. मो.बन्सीलालनगर येथील सिटीजन्स स्पोर्ट सेंटर, भगवान महाविर सांस्कृतीक हॉलच्या तळमजला भाडेतत्वावर देणे बाबत.**

मो.बन्सीलालनगर येथील महानगरपालिकेच्या मालकीचे सिटीजन्स स्पोर्ट सेंटर, अध्यक्ष संत रोहिदास महाराज क्रिडा मंडळ यांना भगवान महाविर सांस्कृतीक हॉलच्या तळमजल्यातील हॉल ज्याचे क्षेत्रफळ २०२.५३ चौ.मी.ची जागा प्रती चौ.मी. प्रती माह रू.११६/- प्रमाणे प्रती माह रू.२३,४९३/- नुसार ५० टक्के ११,७४७/- प्रती माह नुसार व अनामत रक्कम हे मासिक भाडयाच्या बारापट, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह व अकृषी कर रू.७.६८/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष भरणा करून व करारनामा करून भाडेपट्टयाने देणे योग्य.

करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीचे सभागृह, इमारती व दुकान भाडेतत्वावर देणेसाठी दिनांक १६-१-२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती ठराव क्र.२०७ नुसार खालील दर्शविलेले सभागृह, इमारती/दुकाने भाड्याने देण्यास मंजुरी देण्यात येते.

०१. महानगरपालिकेच्या मालकीचे मो.अल्तमश कॉलनी येथील सभागृह श्री.सय्यद मोईनोद्दीन इनामदार, जिल्हा अध्यक्ष, भ्रष्टाचार व अत्याचार विरोधी समिती, औरंगाबाद यांना सदरील ठिकाणचा हॉल भाडेपट्टयावर देणेसाठी प्रती माह भाडे रू.१०००/-, अनामत रक्कम रू.१२,०००/-, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी.प्रती माह व अकृषी कर रक्कम रू.७.६८/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष प्रमाणे भाडयाने देण्यास मंजुरी देण्यात येते.

०२. पुडंलिकनगर येथील आरोग्य केंद्रासाठी खाजगी व्यक्तीकडुन जागा भाडयाने घेण्यासाठी खाजगी व्यक्ती श्री.संजय पिता माणिकराव सरोवर, यांची मिळकत सर्व्हे नं.१६/२ पार्ट मधील प्लॉट क्र.४८

व ४९ क्षेत्रफळ १६७ चौ.मी. पैकी १२५.४ एवढया जागेस रक्कम रू.७९/- प्रती चौ.मी. भाडे रू.१,१८,८७९/- प्रती वर्ष नुसार भाडयाने घेण्यास मंजुरी देण्यात येते.

०३. महानगरपालिकेच्या मालकीचे मो.शहागंज भाजीमंडी येथील रिक्त असलेले दुकान क्र.९६ भाडे रक्कम रू.५९/- प्रती चौ.मी. प्रती माह नुसार रू.११,३२८/- प्रती वर्ष व अनामत रक्कम रू.६१०/- प्रती चौ.मी. प्रमाणे रू.९७६०/- आकारून निविदा काढणेस मंजुरी देण्यात येते.

०४. भारतनगर क्र.१ शाळेसाठी इमारत भाडेतत्वावर घेणेसाठी खाजगी व्यक्ती श्री.जयस्वाल शामलाल मोतीलाल, प्लॉट नं.३० व ३१, भारतनगर रू.५७/- प्रती चौ.मी. प्रती माह भाडे नुसार रू.६७,३७४/- प्रती वर्ष भाडयाने घेण्यास मंजुरी देण्यात येते.

०५. मो.शहागंज येथील भाजीमंडी मधील पर्यायी जागा मिळणे बाबत श्री.मोहम्मद इब्राहिम मो.युसूफ, यांना क्षेत्रफळ २.३ चौ.मी. करीता प्रती माह भाडे रू.१०००/-, अनामत रक्कम रू.१२,०००/-, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी.प्रती माह व अकृषी कर रक्कम रू.७.६८/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष प्रमाणे भाडयाने देण्यास मंजुरी देण्यात येते.

०६. महानगरपालिकेच्या मालकीचे मो.लोटाकारंजा नभुक्र.६७२९ येथील मटनमार्केट क्षेत्रफळ १४०.९५ चौ.मी. साठी रू.११०/- प्रती चौ.मी.प्रती माह भाडे आकारणी नुसार निविदा काढणेस मंजुरी देण्यात येते.

०७. मिर सलामी व्यापारी संकुलातील दुकान क्र.एस-१, एस-२ भाडयाने देणे - श्री.शेख रईस शेख महेबुब, रा.सब्जीमंडी औरंगाबाद यांचे पैठणगेट येथील याबा ॲटो गॅरेज या नावाचे दुकान रस्ता रूंदीकरणामध्ये महानगरपालिकेने त्यांच्या दुकानाची जागा ताब्यात घेतल्यामुळे त्यांना पर्यायी जागा म्हणुन सादिया टॉकीज मागील व्यापारी संकुलातील दुकान क्र. एस-१ व एस-२ ही दुकाने प्रत्येकी रू.४७५२/- प्रती वर्ष भाडे व अनामत रक्कम हे मासिक भाडयाच्या बारापट, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह व अकृषी कर रू.७.६८/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष भरणा करून व करारनामा करून भाडेपट्टयाने देण्यास मंजुरी देण्यात येते.

०८. मिर सलामी व्यापारी संकुलातील तळमजला पर्ल एज्युकेशन ॲण्ड सोसायटी यांना दिर्घ मुदतीच्या लिजवर देणेकरीता श्री.सोहेल अहमद, अध्यक्ष, पर्ल एज्युकेशन ॲण्ड सोसायटी यांना दिर्घमुदतीवर भाडेपट्टयाने देण्यासाठी सदरील तळमजल्याचे क्षेत्रफळ १०६५.२ चौ.मी. साठी आजु बाजुच्या खाजगी दुकानाचे दरानुसार रू.२२,०००/- प्रती माह भाडे व अनामत रक्कम हे मासिक भाडयाच्या बारापट, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह व अकृषी कर रू.७.६८/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष भरणा करून व करारनामा करून भाडेपट्टयाने देण्यास मंजुरी देण्यात येते.

०९. संत भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ, यांना चिकलठाणा येथील जुने झोन कार्यालय क्र.५ च्या उजव्या बाजुची जागा भाडयाने देणेकरीता अध्यक्ष, श्री.मदन राघोजी ढाकणे, संत भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद यांनी सदर ठिकाणच्या मागणी केलेल्या जागेचे क्षेत्रफळ ८८ चौ.मी. सदरील इमारत बऱ्याच दिवसापासून रिक्त असल्याने आजु बाजुच्या परिसरातील भाडे गृहीत धरून रू.२२००/- प्रती माह भाडे व अनामत रक्कम हे मासिक भाडयाच्या बारापट, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह व अकृषी कर रू.७.६८/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष भरणा करून व करारनामा करून भाडेपट्टयाने देण्यास मंजुरी देण्यात येते.

१०. बॉडी केअर हेल्थ कल्ब, औरंगाबाद यांना चिकलठाणा येथील जुने झोन कार्यालय क्र. ५ च्या डाव्या बाजुची जागा भाडयाने देणेसाठी संचालक, श्री.बाबासाहेब मनोहर दहीहंडे, बॉडी केअर हेल्थ कल्ब, चिकलठाणा, औरंगाबाद यांनी सदर ठिकाणच्या मागणी केलेल्या जागेचे क्षेत्रफळ ८८ चौ.मी. आजु बाजुच्या परिसरातील भाडे गृहीत धरून रू.२२००/- प्रती माह व अनामत रक्कम हे मासिक

भाडयाच्या बारापट, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह व अकृषी कर रू.७.६८/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष भरणा करून व करारनामा करून भाडेपट्टयाने देण्यास मंजुरी देण्यात येते.

११. भारतनगर येथील खाजगी व्यक्तीची मिळकत मनपा शाळेसाठी भाडेतत्वावर घेणेसाठी भारतनगर येथील व्यक्ती श्री.संतोष दगडु वाघमारे, यांची मिळकत ज्याचे क्षेत्रफळ ७७.७७ चौ.मी.ची जागा प्रती चौ.मी. प्रती माह भाडे रू.६६/- प्रमाणे रू.५१३३/- प्रती माह नुसार भाडेपट्टयाने घेण्यास मंजुरी देण्यात येते.

१२. मो.बन्सीलालनगर येथील महानगरपालिकेच्या मालकीचे सिटीजन्स स्पोर्ट सेंटर, अध्यक्ष संत रोहिदास महाराज क्रिडा मंडळ यांना भगवान महाविर सांस्कृतीक हॉलच्या तळमजल्यातील हॉल क्षेत्रफळ २०२.५३ चौ.मी.ची जागा रू.११,७४७/- प्रती माह नुसार व अनामत रक्कम हे मासिक भाडयाच्या बारापट, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह व अकृषी कर रू.७.६८/- प्रती चौ.मी. प्रती वर्ष भरणा करून व करारनामा करून भाडेपट्टयाने देण्यास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

संवाद :

| | |
|---|---|
| मा.सभापती | : श्री.एम.एम.खान, शाखा अभियंता यांचे अपिल आपल्याकडे आलेले आहे. |

**विषय क्र. ३२/१ :**

श्री.एम.एम.खान, शाखा अभियंता यांनी त्यांचे निलंबन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२००९/१०४६, दि.२५/६/२००९ चे संदर्भात त्यांचे निलंबन आदेशा विरूध्द सादर केलेल्या अपीलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

संवाद :

| | |
|---|---|
| श्री.सतिष कटकटे | : १८ दिवसांचा चार्ज असतांना त्यांना शिक्षा होती. |
| श्री.सिताराम सुरे | : एका चांगल्या माणसाला दोषी ठरवायचे योग्य नाही. त्यांचे अपिल आले असेल तर मंजूर करून श्री.एम.एम.खान यांना परत कामावर घ्यावे. |
| मा.सभापती | : श्री.एम.एम.खान यांचे निलंबनाबाबत मा.आयुक्त साहेबांनी आदेश दिले होते, स्थायी समितीने अपील घेवून त्याला रिस्टेट करावे |
| श्री.सतिष कटकटे | : जे अपील आलेले आहे ते अपील मंजूर करून त्यांचे निलंबन रद्द करून त्यांना परत कामावर घेण्यात यावे. |
| मा.सभापती | : श्री.एम.एम.खान यांचे अपील आपल्याकडे आलेले आहे स.स.श्री.सतिष कटकटे, स.स.श्री.सिताराम सुरे यांचे सूचनेप्रमाणे श्री.एम.एम.खान यांना निलंबन रद्द करून परत मा.आयुक्त यांनी यावर त्वरीत कारवाई करावी. खातेनिहाय चौकशी चालू करून ती सहा महिण्यांच्या आत पुर्ण करावी. निलंबन काळ रजा काळ धरण्यात येवून त्यांना कामावर रूजू करून घेण्यात यावे. |

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.एम.एम.खान, शाखा अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी त्यांचे निलंबन आदेशाविरूध्द सादर केलेले अपील मान्य करण्यात येऊन कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२००९/१०४६, दि.२५/६/२००९ रद्द करण्यास चौकशीचे अधीन राहून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. निलंबन काळ रजा काळ धरण्यात येवून त्यांना त्वरीत कामावर रूजू करून घेण्यात यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

संवाद :

श्री.प्रशांत देसरडा : अतिक्रमण विभागामार्फत जे सामान ताब्यात घेतले जाते त्यातील काही सामान हे दुसऱ्या दिवशी मुळ मालकास परत मिळत नाही परस्पर त्याची विल्हेवाट लावली जाते. सेव्हनहिल येथुन चहाच्या टपरीचे सामान/10 खुर्च्या आणण्यात आले परंतु दुसऱ्या दिवशी मुळ मालकाच्या 10 खुर्च्या मिळाल्या नाहीत. चारच खुर्च्या मिळाल्या.

वानखेडेनगर येथील घटनेबाबत अतिरिक्त शहर अभियंता यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. न्यायालयामध्ये जामीन झाले. महानगरपालिका जेव्हा नागरीकांचे हिताचे काम करते मगते लाईट,रोड,ड्रेनेज असो त्यात महानगरपालिकेचे मनुष्यबळ हे कमी प्रमाणात असुन नागरीकांच्या हलगर्जीपणामुळे जर पोलिस कार्यकारी अभियंता यांच्यावर पोलिस गुन्हा दाखल करत असेल तर हि खेदाची गोष्ट आहे. पोलिसांवर नागरीकांचा किंवा राजकीय दबाव असु शकतो.

श्री.रविकांत गवळी : अधिकारी सभागृहात काळी फित कशासाठी लावून आले आहे याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा : पोलिसांनी संपूर्ण चौकशी करायला पाहिजे होते तिन तिन अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केला आहे, हि बाब महानगरपालिकेची प्रतिमा मलिन करणारी आहे.

श्री.रविकांत गवळी : अधिकाऱ्यांवर अन्याय होत असेल तर चुकीची पध्दत आहे. वानखेडेनगर येथील एका मुलाचा मृत्यु हा हलगर्जीपणामुळे झालेला आहे, हि वस्तुस्थिती पहाणे गरजेचे आहे. आठ तारखेला मुलाचा मृत्यु होतो त्यावेळी महानगरपालिकेचा कुठलाही पदाधिकारी, अधिकारी त्या ठिकाणी जावून वस्तुस्थितीची पहाणी करतो काय? ही पहाणी का नाही झाली. पेपरमध्ये बातम्या येतात की, महानगरपालिकेच्या चुकीमुळे सदरील व्यक्तिंचा/मुलाचा मृत्यु झालेला आहे हे अधिकाऱ्यांनी पहाणे गरजेचे नव्हते काय?

मा.सभापती : प्रत्येक अधिकाऱ्यांने, नगरसेवकांनी जावून पहाणी केली, तरी सदरील घटना हया टळु शकत नाही. अधिकाऱ्यांना पोलिस स्टेशनमध्ये बोलावुन एखादया गुन्हेगारासारखे वागणुक देणे योग्य नाही.

श्री.रविकांत गवळी : पोलिसांनी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करून अटक केली त्याबाबत आजरोजी निषेध करतो. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या तांत्रिक विभागाचा जो अहवाल आला आहे त्या अहवालावर पोलिसांनी 304 कलमनुसार कारवाई केलेली आहे. 25 दिवस झाल्यानंतरही अधिकाऱ्यांनी पहाणी केलेली नाही.

श्री.विनायक पांडे : ज्यावेळेस नगरसेवक म्हणुन काम करतो त्यावेळी नागरीकांच्या आपल्याकडे मागणी असते. उदा. पोल लावणे व इतर कामे त्यावेळेस काही तांत्रिक बिघाडामुळे काही समस्या निर्माण झाला आणि त्यामुळे पोलमध्ये करंट उतरले तर त्यावेळेस काय नगरसेवकांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणार का? यासाठी आपण निषेध करायला पाहिजे. एखादया नागरीकाने मा.आयुक्त, मा.महापौर, मा.पदाधिकारी विरूध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा

नोंदविला तर मा.सभापतींना उद्या जावून जामीन करावी लागणार आहे. पोलीसांनी कस्टडी रिमांड मागीतला तर आपल्याला जावे लागेल. यासाठी आपण निषेध करायला पाहिजे.

श्री.रविकांत गवळी : पोलीसांनी जी कारवाई केली ती योग्य नाही परंतु ज्या विषयावर राजकारण सुरू आहे आपण सुचक अनुमोदक असतांना विषय मांडला होता महानगरपालिकेच्या हलगर्जीपणामुळे मुलाचा मृत्यु झालेला आहे त्याची महानगरपालिकेतर्फे चौकशी करण्यात येवून आर्थीक मदत देण्यात यावी. यानुषंगाने मा.सर्वसाधारण सभेने विषय नामंजूर केला. पदमपुरा येथील मुलीचा विद्युत पोलचा करंट लागल्यामुळे मृत्यु झालेला आहे त्यांची लेखी मागणी नसतांनासुध्दा मा.महापौर,पदाधिकारी स्वत:जावून त्यांना पन्नास हजारांची मदत केली जाते. विद्युत पोलमुळे त्या मुलाचा मृत्यु झालेला आहे त्याची भरपाई आपण करू शकत नाही.

श्री.प्रशांत देसरडा : ठराव मंजूर करू शकत नाही यात कुणाचा कमीपणा आहे. सदरचा विषय हा सभागृहात चर्चा करण्याचा नाही.

श्री.रविकांत गवळी : आर्थीक मदत करणे गरजेचे होते.

मा.सभापती : सदरची वस्तुस्थिती आहे पोलीस स्टेशनमध्ये गेलो असता पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी सांगीतले की, पदमपुरा येथील मुलीचा मृत्यु झाला तीथे जावुन 50 हजारांची मदत देण्यात आली हि बाब पेपरमध्ये आली. ते लोक मोर्चा घेवून आमच्याकडे आलेत म्हणुन पोलीसांना नाइलाजास्तव अटक करावे लागले.

श्री.विनायक पांडे : वानखेडेनगर येथील मृत्यु झालेल्या मुलाच्या वडीलांनी/नातेवाईकांनी सांगीतले की,आम्हाला कुठलीही मदत नको.

श्री.रविकांत गवळी : शिष्टमंडळ घेवून मी आलो होतो. मा.आयुक्त उपस्थित होते. महानगरपालिकेची ती सामाजिक सामाजिक बांधीलकी म्हणुन मदत असते.

श्री.विनायक पांडे : 50 हजार दिल्यानंतर मोर्चा घेवून आले होते.

मा.सभापती : त्या ठरावास मी सूचक होतो. श्री.सतिष कटकटेही सुचक आहेत, श्री.रविकांत गवळी अनुमोदक आहे. आज रोजी तिन अधिकाऱ्यांना आरोपीसारखी वागणूक मिळाली आहे.

श्री.सतिष कटकटे : दोन व्यक्तींचा मृत्यु झाला आहे त्याचे काय? सदरच्या प्रकरणाची चौकशी करणार आहे का?

श्री.रविकांत गवळी : म.रा.वि.मंडळाच्या तांत्रिक विभागाच्या अहवालामध्ये स्पष्टपणे महानगरपालिकेची चुक दाखविण्यात आली आहे. महानगरपालिकेने खाजगी गुत्तेदारास टेंडर देण्यात आले होते. ज्यापध्दतीने स्विच,बोर्ड लावयला पाहिजे होते ते लावण्यात आले नाही. खाजगी गुत्तेदारावर देखरेखसाठी, लाईनमन, जे.ई., कार्यकारी अभियंता असतात त्यांनी हया गोष्टींवर नियंत्रण ठेवणे गरजेचे होते.

मा.सभापती : खाजगी गुत्तेदाराने चुक केली त्यांच्या चुकीमुळे तिन अधिकाऱ्यांना आरोपी सारखी वागणुक मिळाली.

| | |
|---|---|
| श्री.रविकांत गवळी | : खाजगी गुत्तेदाराने काम केले नाही हे ,लाईनमन,शाखा अभियंता यांनी बघणे गरजेचे आहे. आजरोजी गेल्या विस दिवसांपासून वानखेडेनगर येथे अंधार आहे. केबल उघडया अवस्थेत आहेत. अजून काम झालेले नाही. |
| श्री.सतिष कटकटे | : केबल उघडया स्थितीत आहे काम अर्धवट आहे. हया सर्व गोष्टी पहाण्याचे अधिकारी/कर्मचाऱ्यांचे काम नाही काय? |
| मा.सभापती | : पदमपुरा येथील गुत्तेदारावर गुन्हा दाखल केलेला आहे. अधिकाऱ्यांनी गुत्तेदारावर गुन्हा का नाही दाखल केला. |
| श्री.सतिष कटकटे | : वार्ड अ, ड कुणाच्या नियंत्रणात आहे खुलासा करण्यात यावा. |
| श्री.प्रशांत देसरडा | : प्रशासनास काही प्रशासकीय मदत लागत असेल तर ती देण्यात येईल. |
| मा.सभापती | : कोणत्याही पदाधिकाऱ्याने ज्या तीन अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल झालेला आहे त्यांची विचारपुस देखील केलेली नाही. अधिकारी हे घाबरलेल्या अवस्थेत होते. अधिकाऱ्यांना फोन लावत असतांना त्यांनी तो बंद केलेला होता पोलीसांच्या धाकाने फोन बंद करून ठेवला जातो. |
| श्री.रविकांत गवळी | : बेगमपुरा पोलीसस्टेशन मध्ये मयत मुलाच्या वडीलांनी गुन्हा दाखल केला. मदत घेण्याचे नाकारले आहे. ज्या व्यक्तीच्या हलगर्जीपणामुळे झाले असेल त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे त्यांना शिक्षा झालीच पाहिजे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : सदरचा गुन्हा वानखेडेनगरच्या जनतेने केला आहे काय? |
| श्री.रविकांत गवळी | : मुलाच्या वडीलांनी गुन्हा दाखल केला. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : गुन्हा केव्हा नोंदविला गेला जेव्हा महागनरपालिकेने आर्थीक मदत केली नाही म्हणुन. |
| श्री.रविकांत गवळी | : नऊ तारखेला गुन्हा दाखल केलेला आहे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : पुढे अशा घटना घडु नये म्हणून उपाययोजना केली पाहिजे. |
| श्री.रविकांत गवळी | : ठरावात स्पष्ट केले होते की, त्यांना आर्थीक मदत देण्यात यावी व संपूर्ण चौकशी करून चौकशी अंती गुन्हा दाखल करावा. विषय जाणीवपुर्वक नामंजूर करण्यात आला. किराडपुरा येथील दुकानांचा, रेल्वेस्टेशन येथील मुलाचा मृत्युबाबत विषय मंजूर होतात. फक्त हा विषय माझा आहे म्हणुन मंजूर होत नाही. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : महानगरपालिकेच्या चुकीमुळे एखादयाची जिवीत हानी झाली असेल तर शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे प्रत्येकाला मदत करावी. |
| श्री.रविकांत गवळी | : शासनाचा जीआर महानगरपालिका, रेल्वे बोर्ड, तसेच प्रत्येक शासकीय कार्यालयाला दिलेला आहे. ज्याच्या हलगर्जीपणामुळे ज्या व्यक्तीचा मृत्यु झाला असेल तर त्यास जबाबदार धरण्यात यावे. |
| मा.सभापती | : प्रशासनाकडे जीआर आहे प्रशासन जीआर बघून पुढील बैठकीत जीआरबाबत खुलासा करतील. |
| श्री.प्रशांत देसरडा | : सुचक नसल्यामुळे विषय रद्द केला असेल. येणाऱ्या बैठकीत सदरचा विषय ठेवून संपविण्यात यावा. |
| श्री.रविकांत गवळी | : कलम 304 अन्वये पोलीसांनी गुन्हा दाखल केला, एका महिण्यामध्ये प्रशासनाने कुठली कारवाई केली. शासनाचे परिपत्रक आहे की, महानगरपालिकेचे किंवा एखाद्या शासकीय कार्यालय, बोर्डाच्या चुकीमुळे |

एखाद्या व्यक्तीचा मृत्यु झाल्यास ती संस्था जबाबदार असते. याबाबत आपल्याकडे परिपत्रक आहे का? समजा बी अँड सी ने एखादा खड्डा खोदला व त्या खड्ड्यामुळे एखाद्याचा मृत्यु झाल्यास ती संस्था जबाबदार नाही का?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : प्रत्येक वार्डास टाइम लिमीट देण्यात यावी प्रत्येक वार्डात अभियंत्याने जावून कुठल्या डिपी, केबल उघडया अवस्थेत आहे याची पहाणी करावी, नगरसेवकांनी याबाबत आपल्या वार्डाची पहाणी करावी.

मा.सभापती : जे केबल उघडया स्थितीत आहे ते अंडरग्राऊंड केबल टाकण्यासाठी आवश्यक असणारा निधी त्वरीत उपलब्ध करून देण्यात येईल. संबंधीत अधिकारी यांनी तातडीने अंदाजपत्रक तयार करून काम त्वरीत हाती घेण्याचे दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी. या कामासाठी आवश्यक असणारी आर्थिक तरतुद अर्थसंकल्पात करण्यात येईल.

श्रीमती मेहरून्निसा खान : महानगरपालिकेचे अधिकारी कुठलेच कामे करीत नाही.

(श्रीमती मेहरून्निसा खान सभा सोडुन जातात.)

श्री.रविकांत गवळी : 25 दिवसात प्रशासनाने कुठली कारवाई केली.

मा.सभापती : प्रशासनाने कुठली चौकशी केली खुलासा करण्यात यावा.

अति.शहर अभियंता : दिनांक 22.06.09 रोजी वानखेडेनगर येथील काही नागरीक आणि स.सदस्य मा.आयुक्तांच्या दालनात निवेदन घेवून प्रकरणात कारवाई करा म्हणून आग्रह धरला होता. मा.आयुक्तांनी त्या प्रकरणात चौकशी करण्याचे आदेश दिले होते त्याप्रमाणे प्रत्यक्ष स्थळावर जावून प्रत्येक कामाचा आढावा घेवून तपासणी करून प्रत्येक बाबीचा तपशील नमुद करून अहवाल मा.आयुक्तांना सादर केला.

श्री.रविकांत गवळी : 22 तारखेला निवेदन घेउन आल्यानंतर चौकशी केली जाते. आठ तारखेला मुलाचा मृत्यु होतो आठ ते सव्विस तारखेपर्यत प्रशासन काय करते. प्रत्येक दैनिक वर्तमानपत्रात बातमी आलेली होती.

मा.सभापती : चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले.

अति.शहर अभियंता : चौकशीमध्ये असे निष्पन्न झाले की, घरासमोर जो पोल होता तिथे नळाचे खोदकाम झालेले होते त्याच्यामुळे केबल डॅमेज झाली होती आणि जे काम झाले होते ते सदोष होते.

मा.सभापती : कोणी काम केले होते.

अति.शहर अभियंता : अन्सारी नावाच्या गुत्तेदाराने काम केले होते.

मा.सभापती : अन्सारी गुत्तेदारा विरूध्द गुन्हा दाखल केला आहे का?

अति.शहर अभियंता : अहवाल मा.आयुक्तांना सादर केलेला आहे.

मा.सभापती : पदमपुरा येथील प्रकरणातही अन्सारी दोषी आहे त्या प्रकरणातही गुन्हा नोंदविलेला आहे. तात्काळ अन्सारी नावाच्या कंत्राटदाराविरूध्द गुन्हा नोंदविण्यात यावा व पुढच्या स्थायी समितीत रिपोर्ट देण्यात यावा. काम केव्हा झाले.

श्री.रविकांत गवळी : अभियंता व दुय्यक आवेक्षक यांनी तपासणी करायला हवी होती.

अति.शहर अभियंता : मार्च 2008 ला काम झाले.

श्री.रविकांत गवळी : बिल दिले गेले का.

अति.शहर अभियंता : बिल दिले गेले.

मा.सभापती : अन्सारी कंत्राटदारावर नियंत्रण का नाही ठेवले.

श्री.रविकांत गवळी : 25 दिवसांत कारवाई न झाल्याने तक्रारदाराने गुन्हा नोंदविण्यात आला.

अति.शहर अभियंता : चौकशी चालू होती आणि आहे त्या परिस्थितीला धक्का लावता येत नव्हता. सध्या तेथील विद्युत पुरवठा पुर्णपणे बंद केलेला आहे त्याचे कारण की, विद्युत पुरवठा चालू ठेवला असतातर अजुन काही घटना घडल्या असत्या.

श्री.रविकांत गवळी : सदरची घटना चुकीची झालेली आहे. गेल्या 25 दिवसांपासून विद्युत पुरवठा खंडीत झालेला आहे. महानगरपालिकेतर्फे याच्यावर कारवाई होणार का?

मा.सभापती : गुत्तेदारावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहे.

श्री.रविकांत गवळी : चौकशी महानगरपालिकेअंतर्गत झाली पाहिजे.

मा.सभापती : याप्रकरणी दोन जणांचा मृत्यु झालेला आहे. पदमपुरा आणि वानखेडेनगर येथील प्रत्येकी एक एक असे दोन जणांचा मृत्यु झालेला आहे. या दोन्ही ठिकाणांचे कंत्राटदार एकच आहे

श्री.नारायण कुचे : राहुल विष्णु रगडे नामक मुलाचा मृत्यु झालेला आहे महानगरपालिकेचा पोलचा विषय नव्हता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचा यात रोल होता.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : काही नागरीक घरांमध्ये आकडे टाकून विद्युत पुरवठा घेतात.

श्री.विनायक पांडे : सर्व वार्डात जेवढे जीआय पोल लावलेले आहे त्याचे महानगरपालिकेच्या अभियंता,लाईनमन कडुन सर्वेक्षण करून तपासणी करून दुरूस्ती करण्यात यावी.

मा.सभापती : प्रशासनाच्या म्हणण्यानुसार तपासणीचे काम चालूच आहे. वानखेडेनगर येथे जी घटना झालेली आहे त्यास श्री.अन्सारी गुत्तेदार जबाबदार आहे. त्यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा. वानखेडेनगर येथे 20 दिवसांपासून लाईट बंद आहे शहर अभियंता यांनी याबाबत चौकशी करावी, ज्युनिअर इंजिनिअर,लाईनमन यांनी प्रत्येक पोलची तपासणी करावी. जी घटना घडलेली आहे त्यांच्या विरूध्द कारवाई करण्यात यावी. मा.आयुक्तांनी पोलिस आयुक्तांना पत्र देण्यात यावे की, अशी कुठली घटना घडल्यास प्रशासनास विचारपुस केल्याशिवाय गुन्हा दाखल करू नये अधिकाऱ्यांना त्रासात टाकु नये. पोलीसांनी जो एकतर्फी गुन्हा दाखल केलेला आहे अधिकारी कर्मचाऱ्यांवर याबाबत स्थायी समिती पोलिस विभागाचा निषेध करीत आहे. पोलीसांनी पुढे अशी कारवाई करू नये.

श्री.सिताराम सुरे : पाणी पुरवठा विभाग क्रमांक 2 सिडको या भागामध्ये पाण्याची टंचाई नेहमी आहे एका कॉलणीस जास्त वेळ पाणी आणि एका कॉलणीस कमी पाणी दिले जाते. त्याभागातील जे लाईनमन आहे त्यांनी अवैध नळकनेक्शन दिलेले आहे असे मागील बैठकीत सांगीतले होते. श्री.निर्मल आणि श्री.फुले असे लाईनमनचे नांव आहे यांच्यावर कारवाई करण्यासाठी मागच्या वर्षी सांगीतले होते. कार्यकारी अभियंता वार्ड ब, उपअभियंता यांना सुध्दा

पत्रव्यवहार केलेला आहे. त्यांची तात्काळ जायकवाडी येथे बदली करण्यात यावी. त्यांना शहरात ठेवू नका.

मा.सभापती : श्री.निर्मल आणि श्री.फुले सध्या कुठल्या वार्डामध्ये आहे.

श्री.सिताराम सुरे : वार्ड नं 2,3,16,15 ला वॉटर सप्लाय करतात. त्यांच्यामुळे पाणी पुरवठयावर परीणाम होतो.

मा.सभापती : जनतेला पाणीपुरवठयाचे वितरण व्यवस्थितरीत्या होत नाही, अवैध नळकनेक्शन दिले जाते. मनाप्रमाणे कामे करतात त्यामुळे श्री.निर्मल आणि श्री.फुले, लाईनमन यांची तात्काळ 24 तासात बदली करण्यात यावी.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : माझ्या वॉर्डात पॅचवर्कचे काम सुरू झालेले नाही.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

शहर अभियंता : कार्यकारी अभियंता आणि श्री.वझे यांना तात्काळ कारवाई करण्या संदर्भात सांगीतले होते तरी काम सुरू करण्याची कारवाई करण्याचे आदेश देवू.

कार्यकारी अभियंता
श्री.डि.पी.कुलकर्णी : मा.शहर अभियंता यांनी आदेशीत केले होते परंतु पेव्हर मशीन बंद असल्यामुळे/चैन तुटल्यामुळे काम सुरू करण्यास उशीर होत आहे.

मा.सभापती : उद्या जातीने लक्ष घालुन काम सुरू करावे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : सुतगीरणी चौक येथे वारंवार अपघात होत आहे. चार ते पाच व्यक्तिंचा मृत्यु झालेला आहे. तेथे वाहतुक संकेतांक बसवावे व वाहतुक बेट विकसीत करावे.

मा.सभापती :मा.शहर अभियंता यांनी पहाणी करून सुतगीरणी चौक येथे चार ते पाच व्यक्तिंचा मृत्यु झालेला आहे आणि पुन्हा अशी काही घटना घडल्यास याबाबत मा.शहर अभियंता यांना जबाबदार धरण्यात येईल. स.सदस्यांच्या भावाचा त्या ठिकाणी मृत्यु झालेला आहे. मा.शहर अभियंता यांनी स्वतः सुत गीरणी येथे जावून पहाणी करावी.

शहर अभियंता : यासाठी जी काही आर्थीक तरतुद आहे तशी तरतुद अर्थसंकल्पात ठेवण्यात यावी. आपल्याकडे इस्टिमेट सादर करण्यात येईल.

श्रीमती सफिया मोमीम : वॉर्ड एफ मध्ये पॅचवर्कच्या कामासाठी लाखोरूपये खर्च करण्यात आले. साधारणत:25 लाखाचे डांबरी पॅचवर्क कुठेकुठे झाले कोण गुत्तेदार होता याची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता : जानेवारीपासून चार्ज आलेला आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : मा.शहर अभियंता यांनी ज्या ज्या ठिकाणी पॅचवर्कचे काम झालेले आहे त्याची पहाणी करावी व पॅचवर्क झाले आहे किंवा नाही या बाबत पहाणी करून अहवाल देण्यात यावा.

श्री.सतिष कटकटे : मा.आयुक्तांनी रस्त्यांवरचे खड्डयांची मोजणी केली होती. 21 लाख खर्च झाले किंवा नाही.

मा.सभापती : मागील दोन वर्षात झालेल्या पॅचवर्कची सविस्तर माहिती घेवून 15 दिवसांत स्वत: चौकशी करून स्थायी समितीमध्ये अहवाल सादर करावा.

श्री.प्रशांत देसरडा : उधारीच्या परवानगिवर स्पेशल बैठक आयोजित करणार होते.

मा.सभापती : उधारीच्या बांधकाम परवानगी बाबत दोन पत्र शहर अभियंता यांना दिलेले आहे. अद्यापपर्यंत खुलासा केलेला नाही.

शहर अभियंता : संचिका सादर केलेली आहे.

मा.सभापती : मुख्यलेखाधिकारी यांचेकडे चौकशी दिली होती त्याबाबत काय झाले.

मुख्यलेखाधिकारी : सोमवारी अहवाल सादर करण्यात येईल.

श्री.सतिष कटकटे : उधारीवर परवानगी देता येते का?

मा.सभापती : सर्वसाधारण सभेमध्ये विना चौकशी निलंबीत करता येते परंतु स्थायी समितीत तसे करता येत नाही. दोन्ही सभांसाठी वेगवेगळा कायदा आहे.

श्री.सिताराम सुरे : वॉर्ड क्रमांक 2 मधील कामधेनू सोसायटी येथील नागरीकांनी महानगरपालिकेस, नगर रचना विभागास पत्र दिलेले आहे. त्यांनी मंत्रालयात मा.राज्यमंत्री श्री. हसन मुश्रीफ साहेब यांना पत्र दिलेले आहे. महापालिकेस त्यांनी आदेश दिलेले आहे. त्या आदेशाचे काय झाले आहे. 1991 साली 24 मिटरचा रस्ता असतांना बांधकामाची परवानगी दिलेली आहे आज रोजी तो रस्ता 45 मिटरचा झालेला आहे.45 मिटरच्या रस्त्यावर परवानगी कशी देता येईल.

मा.सभापती : टिपी सेक्शनने खुलासा केलेला आहे. कामधेनु सोसायटीची संचिका गहाळ झालेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा : आपण 10 दिवसात संचिका देण्याचे आदेशीत करा. गुन्हा दाखल करण्याचे आदेशीत करा, आता सापडेल.

श्री.रविकांत गवळी : लेखी पत्र आलेले आहे.

श्री.सिताराम सुरे : मा.राज्यमंत्री हसन मुश्रीस साहेब यांनी आदेश दिले आहे त्याची अंमलबजावणी झालीच नाही.

मा.सभापती : प्रशासनाने जसे सभापतीस पत्र देण्यात आले तसे पत्र मा.राज्यमंत्री हसन मुश्रीस साहेब यांना देण्यात यावे. की कामधेनुची संचिका गहाळ झालेली आहे .

श्री.रविकांत गवळी : माझा 80 टक्के वार्ड गुंठेवारी मध्ये येतो. आज रोजी 2001 मध्ये गुंठेवारीमध्ये ज्यांनी पैसे भरलेली आहे व जे पैसे भरण्यासाठी आल्यावर 50 टक्कयाचे चलन देवुन ती संचिका टाउन प्लॅनिंगला पाठविली जाते.

मा.सभापती : प्रशासनाने सिटी सर्व्हेकडे पत्र पाठविल्यानंतर पैसे भरणार नाही काय? तीन महिण्यांपासून मा.राज्यमंत्री यांचे पत्र आले असून पैसे भरले जात नाही.

शहर अभियंता : लेखा विभागाकडे देण्यात आलेले आहे.

मा.सभापती : कामधेनु सोसायटीच्या बाबतीत पैसे भरण्याची संचिका आपल्या विभागाकडे आहे काय खुलासा करण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी : माझ्या समोर तर आलेली नाही आवक जावक विभागाकडे चौकशी करून खुलासा करण्यात येईल.

शहर अभियंता : सदरील चार्ज कार्यकारी अभियंता श्री.डी.पी.कुलकर्णी यांचेकडे दिलेला आहे चौकशी करण्यात येईल.

मा.सभापती : सहाय्यक संचालक नगर रचना वारंवार बदलले जातात. तीन महिण्यात प्रशासनाने काय कारवाई केली खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता : संचिका त्वरीत मागवून माहिती देण्यात येईल.

मा.सभापती : Completion (भोगवटा प्रमाणपत्र) संचिका गहाळ झाल्याचे पत्र कालच मिळाले. कामधेनूची आणि Completion ची हया दोन्ही संचिका गहाळ झालेल्या आहेत.

शहर अभियंता : चार्ज कार्यकारी अभियंता (श्री.डी.पी.कुलकर्णी) यांचेकडे दिलेला आहे.

श्री.प्रशांत देसरडा : ॲटो डीसीआर च्या माध्यमातून बांधकाम परवानगी दिलेली आहे काय?

मा.सभापती : त्यावेळेस ॲटो डिसीआर नव्हते.

श्री.रविकांत गवळी : 2000 मध्ये डीपी प्लॅन चेंज झाला आणि 24 मिटरचा रस्ता 45 मिटरचा झाला ज्या वेळेस 2003 ला बांधकाम करायचे आहे बांधकाम परवानगी 24 मिटर ग्राहय धरले जाईल की, 45 मिटर ग्राहय धरले जाईल. त्या डेव्हलपरकरीता विशिष्ट नियम लावण्यात आले आहे.डीपी प्लॅन मंजूर असतांनासुध्दा 24 मिटरवर बांधकाम परवानगी देण्यात आली. सदरची परवानगी देता येते का?

कार्यकारी अभियंता : मा.मंत्री महोदय यांनी जे पत्र दिलेले आहे त्याच्यावर प्रशासनाने मोजणीसाठी पत्र दिलेले आहे आणि 06.06.2009 रोजी सिटी सर्व्हेकडुन पत्र आलेले आहे सातबारा आणि इतर कागदपत्र सादर करा किती फिस होती ते कळविण्यांत येईल.

मा.सभापती : राज्यमंत्री यांचे पत्र केव्हा आलेले आहे.

कार्यकारी अभियंता : दिनांक 04.03.2009रोजी पत्र आलेले आहे.

मा.सभापती : चार महिण्यांमध्ये राज्यमंत्री यांचे पत्र आलेले असतांना मोजणी फिस भरू शकत नाही याचे कारण काय? कामधेनु सोसायटी आणि सनी सिटी सेंटरलाही परवानगी दिलेली आहे आणि तिथे डिपी रोड 45 मिटरचा आहे टेप लावून मोजल्यास 45 मिटरचा रोड आहे काय?

कार्यकारी अभियंता : पाहुन, तपासणी करून सांगण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी : श्री.निकम यांना विचारण्यात यावे.

श्री.नारायण कुचे : विभाग प्रमुखांना विचारण्यात यावे त्यांच्याकडुन खुलासा घेण्यात यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : ज्यावेळेस बांधकाम झाले त्यावेळेस शहर अभियंता महानगरपालिकेत कार्यरत नव्हते. त्यावेळी जे अधिकारी कार्यरत होते त्यांना बोलविण्यात यावे.

मा.सभापती : संचिका गहाळ झाल्याचे पत्र देण्यात आलेले आहे.

श्री.प्रशांत देसरडा : चौकशी समिती नेमण्यात यावी.

मा.सभापती : मा.आयुक्तांचे तांत्रिक कक्ष प्रमुख श्री.काझी यांनी खुलासा करावा.

श्री.रविकांत गवळी : Completion Certificate दिल्यानंतर त्याठिकाणी दोन्ही बांधकामाच्या मधला 45 मिटरचा रस्ता असायलाच पाहिजे. स्थळ पहाणी करण्यात यावी.

श्री.नारायण कुचे : विभागप्रमुख यांनी खुलासा करण्यात यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : या प्रकरणांत जो कोणी दोषी आढळेल त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

श्री.सतिष कटकटे : तीन महिण्यापूर्वी पत्र कोणास दिले होते.

मा.सभापती : मा.शहर अभियंता यांना पत्र देण्यात आले होते.

शहर अभियंता : आमच्याकडे पत्र आल्यानंतर उप अभियंतांना कारवाईसाठी पत्र देण्यात येते त्यावेळेस श्री. काझी उप अभियंता होते.

मा.सभापती : डिपी प्लॅन आणुन दाखविण्यात यावा.

शहर अभियंता : डिपी प्लॅन दाखविण्यात येईल.

मा.सभापती : डिपी रोडमध्ये किती मिटरचा रस्ता आहे आणि सध्या अस्तित्वात असलेला रस्ता किती मिटरचा आहे खुलासा करण्यात यावा. श्री.निकम यांनी खुलासा करावा.

श्री.निकम : सदरील रस्ता डिपी प्लॅनमध्ये 45 मिटरचा आहे.

मा.सभापती : पुर्वी किती मिटरचा रस्ता होता.

श्री.निकम : पुर्वी 24 मिटरचा रस्ता होता.

मा.सभापती : कुठल्या दिशेने 45 मिटरचा रस्ता झालेला आहे.

श्री.निकम : निश्चित नकाशा बघीतल्या शिवाय सांगता येणार नाही.

श्री.रविकांत गवळी : 24 मिटरचा रस्ता 45 मिटरचा केव्हा झाला.

श्री.सतिष कटकटे : 45 केव्हा झाला परवानगी देण्याच्या पुर्वी झाला कि नंतर झाला.

मा.सभापती : कामधेनु सोसायटी येथील नागरीकांनी स्थायी समितीसमोर नकाशा सादर केलेला आहे.

श्री.निकम : सदरील रस्ता 45 मिटरचा आहे आणि माइनर मॉडिफिकेशनमध्ये दक्षिणे कडे वाढलेला दिसतो.

मा.सभापती : सनि सेंटर कुठल्या दिशेला आहे.

श्री.निकम : सनि सेंटर दक्षिण दिशेला आहे.

मा.सभापती : प्रत्यक्षात 45 मिटरचा रोड दिसतो काय?

श्री.निकम : प्रत्यक्षात रूंदि कमी दिसते आहे.

श्री.रविकांत गवळी : प्रशासनाच्या म्हणण्यानुसार दक्षिण बाजुला 45 मिटरचे क्षेत्र वाढलेले आहे. डिपी प्लॅन मंजूर केव्हा झाला.

श्री.निकम : सन 2002 ला डिपी प्लॅन मंजूर झाला.

मा.सभापती : परवानगी सन 2003ला दिली गेली आणि completion 2008 मध्ये दिले गेले. कामधेनूच्या संचिकेबाबत श्री.निकम यांचा संबध नाही स्थायी समितीला मा.शहर अभियंता यांच्या सहीने पत्र आलेले आहे कामधेनु सोसायटीची संचिका गहाळ झालेली आहे आणि Completion ची संचिका मिळत नसल्याचे श्री.डी.पी.कुलकर्णी यांचे पत्र आलेले आहे.

श्री.नारायण कुचे : सन 2008 मध्ये Completion Certificate दिले त्यावेळेस कोणत्या अधिकारीने Completion Certificate दिले.

मा.सभापती : कामधेनु सोसायटीची संचिका गहाळ झाली आहे श्री.काझी यांना याबाबत काय माहिती आहे. खुलासा करण्यात यावा.

श्री.सिताराम सुरे : प्रशासनाने खुलासा केल्याप्रमाणे 45 मिटरची वाढ दक्षिण दिशेला आहे माझ्या माहितीनुसार ती पुर्व दिशा आहे.

तांत्रिक कक्ष प्रमुख : सर्वे नंबर 8 हर्सुल याठिकाणी सन 1988-89 मध्ये मंजूर झालेली कामधेनु हॉ.सोसायटीची रेखांकनाची संचिका हि आक्षेपासंदर्भांत तपासणी करण्यासाठी शोध घेण्यात आला परंतु ती संचिका कार्यालयात आढळून आली नाही.

मा.सभापती : पोलीस केस दाखल करण्याचे आदेश देवू.

| | |
|---|---|
| श्री.सिताराम सुरे | : माझ्या माहितीनुसार ती पुर्व बाजू आहे. |
| श्री.निकम | : आंबेडकर चौकाकडुन एपीएमसी कडे जातांना साधारणतःती पुर्व दिशा आहे आणि सनिसेंटर हि बिल्डींग दक्षिण दिशेस झालेली आहे. |
| श्री.सिताराम सुरे | : सनिसेंटरचे आजही काम सुरू आहे सनिसेंटरच्या अर्ध्याकामास Completion दिलेले आहे. सनिसेंटरकडे Completion Certificate आहे. बांधकाम अवैधरित्या चालले असेलतर ते बांधकाम तात्काळ थांबविण्यात यावे. डिपी रस्त्यामध्ये काम चालू आहे. |
| श्री.नारायण कुचे | : विभागप्रमुखाची जबाबदारी आहे. विभाग प्रमुखांनी खुलासा करावा. |
| मा.सभापती | : Completion Certificate दिले त्यावेळेस कोण अधिकारी होते प्रशासनाने खुलासा करावा. |
| शहर अभियंता | : टिपी सेक्शनचा संपुर्ण चार्ज श्री.डि.पी.कुलकर्णी यांचेकडे दिलेला आहे. |
| श्री.नारायण कुचे | : सन 2008 साली Completion Certificate दिले होते त्यावेळेस शहर अभियंता कार्यरत होते त्यांनी खुलासा दयावा. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : ज्या संचिका गहाळ झालेल्या आहे त्यांच्या सर्वावर कारवाई करावी व गुन्हा नोंदविण्यात यावे. |
| श्री.रविकांत गवळी | : सन 2000 पासून कामधेनू सोसायटी येथील नागरीकांनी वारंवार आपल्याकडे तक्रार केलेली आहे. 1994 रोजी बांधकाम परवानगी दिलेली असतांना माजी सैनिक आणि सेवानिवृत्त लोकांचे घर आपण तोडत आहे. सन 2002 ला डिपी प्लॅन मंजूर झालेले असतांना सन 2003 ला बांधकाम परवानगी देतो Completion Certificate देतो व त्या संचिका गहाळ होतात. माजी सैनिक यांनी तालुका निरीक्षक भुमि अभिलेख यांच्याकडुन माहितीच्या अधिकारातुन माहिती घेतली त्यांनी माहिती अशी दिलेली आहे की, वाढीव रोडची मोजणी शासन मंजूर नकाशाप्रमाणे नाही. हा आपला समज बरोबर आहे.तालुका निरीक्षक, भुमिअभिलेख यांनी माहितीच्या अधिकारात लेखी माहिती दिलेली आहे. कलम दोन मध्ये असे दिलेले आहे की,वाढीव रोडची मोजणी शासन मंजूर नकाशाप्रमाणे नाही. महानगपालिकेच्या पत्रासोबत आलेल्या विकास आराखडयाचा मंजूर नकाशाप्रमाणे वाढीव रूंदीकरण सध्याच्या जाधववाडी ते पिसादेवी रोड जाणाऱ्या रोडच्या उजवीकडे आहे.प्रशासन दक्षिण बाजू बोलतात स.सदस्य पूर्व बाजू बोलत आहे. सदरील माहिती आपल्याकडे सादर केलेली आहे. यावर प्रकाश टाकण्यात यावे. |
| मा.सभापती | : मागील 1 तासापासून कामधेनू सोसायटी आणि सनि सेंटर यावर चर्चा चालू आहे खेदाने नमुद करावे लागते की, प्रशासन एवढा गंभीर प्रश्न गंभिरतेने घेत नाही. टिपी सेक्शनने पत्र दिले की, कामधेनु सोसायटीची संचिका गहाळ झालेली आहे आणि जेव्हा सनि सेंटरची Completion Certificate ची संचिका मागविण्यात आली तेव्हा तीही संचिका गहाळ झाल्याचे पत्र मिळाले. टिपी सेक्शनच्या कुठल्याच अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी 45 मिटरचा रोड आहे हा खुलासा करण्यास असमर्थता दर्शविली. एवढा गंभीर प्रश्न असतांना सर्व अधिकारी प्रश्न लपविण्याचा प्रयत्न करीत |

असल्याचे दिसत आहे. तरी याबाबत कामधेनु सोसायटीची संचिका आणि सनि सेंटरची Competion ची संचिका गहाळ झाली आहे त्यात जे कोणी दोषी असेल त्याबाबत चौकशी सुरू होईल. सनि सेंटरची चौकशी करण्याचे आदेश श्री.पानझडे, कार्यकारी अभियंता आणि कामधेनु सोसायटीची चौकशी करण्याचे आदेश श्री.पानझडे, कार्यकारी अभियंता यांना देण्यात येते तसेच त्यांना सहाय्यक म्हणुन श्री.खन्ना काम करतील, चौकशी अधिकारी यांनी 10 दिवसांत स्थायी समितीत सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा. ज्या दोन संचिका गहाळ झाल्या आहेत त्यात सध्याचे सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी तात्काळ गुन्हा संबधीत पोलीस स्टेशनमध्ये दाखल करावा तसेच प्रशासकीय अधिकारी श्री.जरारे यांना आदेशीत करण्यात येते की, कामधेनु सोसायटी आणि सनि सेंटर येथे कुठले काम चालू असेल तर ते काम तात्काळ थांबविण्यात यावे तसा अहवाल स्थायी समितीसमोर सादर करण्यात यावा तोपर्यंत कामधेनु सोसायटीला देण्यात आलेली बांधकाम परवानगी स्थगीत ठेवण्यात येते. बांधकाम परवानगी मा.आयुक्त साहेबांनी तात्काळ स्थगीत करावी. उदयापासून कुठलेही काम होणार नाही याची दक्षता प्रशासनाने घ्यावी. श्री.पानझडे,कार्यकारी अभियंता यांनी दहा दिवसांत अहवाल सादर करावा आणि उद्याच्या उद्या गुन्हा दाखल करावा.

श्री.प्रशांत देसरडा : कामधेनु प्रकरण, सनि सेंटर, स्पेक या व इतर सर्व प्रकरणात एक बाब दिसून येते की, या सर्वांवर मा.आयुक्तांचे वर्चस्व नाही. कोणतेही आयुक्त आले की शासन दोन चार महिण्यात बदली केली जाते त्यामुळे महानगरपालिकेच्या महसुल उत्पन्नावर व अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत आहे. मा.मुख्यंमत्र्यांना भेटण्यासाठी जाल त्यावेळी मा.मुख्यमंत्र्यांना कायम स्वरूपी आयुक्तांची मागणी करण्यात यावी. मा.आयुक्त श्री.वैद्य यांना आत्ता कुठे महानगरपालिकेच्या कामाची पध्दत माहिती होत असतांनाच त्यांची बदली झाली. मा.आयुक्तांनी 46 लाख रूपये स्पेक कडून वसूल करतील असे न्यायालयात ॲफीडेव्हिट दिले आहे व आयुक्तांची बदली झाली. आता पुन्हा नविन आयुक्त येईल व दोन महिण्यात विधानसभेची आचारसंहिता लागू होईल. शासन कुठेतरी भेदभाव करत आहे पुर्णवेळ आयुक्त न दिल्यामुळे विकास कामांना गती येणार नाही त्यामुळे नागरीकांमध्ये सत्ताधारी पक्षाची प्रतिमा खराब व्हावी. त्यामुळे शासन पुर्णवेळ आयुक्त देत नाही.

मा.सभापती : श्री.गुप्ता साहेब आयुक्त म्हणुन सव्वा तीन वर्ष होते. पक्षाचे राजकारण करण्यात येवू नये.

श्री.प्रशांत देसरडा : आघाडीचे सरकार कोणत्याही प्रकारचे आयुक्त टिकु देत नाही. आत्ता श्री.वैद्य साहेब सक्षमपणे काम करत होते त्यांची बदली करण्यात आली. यात राजकारणाचा भाग दिसतो.

मा.सभापती : याबाबत उच्च न्यायालयात रिट दाखल करण्यात यावे.

श्री.सतिष कटकटे : स्पेक संदर्भात उच्च न्यायालयाने आदेश दिले कि,त्यांच्यावर गुन्हा दाखल केला काय?

मा.सभापती : स्पेक बाबत संभ्रम निर्माण होत आहे.

श्री.प्रशांत देसरडा : दिलेला अहवाल अजुनपर्यंत फोडण्यात आलेला नाही. आपण शासनाकडे विनंती करा की, येणारा आयुक्त पुर्णवेळ देण्यात यावा म्हणून, शिवसेना भाजपाची सत्ता असल्याने या ठिकाणी पुर्ण वेळ आयुक्त टिकु देत नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : आयुक्त टिकवायचा नाही टिकवायचा हा तुमच्या आमच्यावर जास्त महत्वाचा आहे.

श्री.प्रशांत देसरडा : आयुक्त टिकविण्याची जबाबदारी आमची नाही, आयुक्तांना नेहमीच सहकार्य केलेले आहे.

श्री.रविकांत गवळी : कायमस्वरूपी आयुक्त देण्यात यावा. यासंदर्भात शासनास कळविण्यांत यावे.

मा.सभापती : पक्षाचे राजकारण आणू नये. मा.गुप्ता साहेब तीन वर्ष राहील त्यावेळी विषय नव्हता. मा.उच्च न्यायालयात जावे. स्पेक संदर्भात सर्वसाधारण सभा व स्थायी सभेमध्ये सर्वांत जास्त चर्चा झालेली आहे.स.सदस्यांना सांगू इच्छितो की, स्थायी समितीकडे एकुण 12 अहवाल आलेले आहे ते फुटलेले नाही. स्पेक बाबत माहिती मुख्य लेखा परिक्षक श्री.जाधव यांनी मा.आयुक्त श्री.बंड साहेबांकडे दिली . ज्यावेळी बंड साहेबांनी करार ब्रेक केला त्यावेळी आपली रिट पिटीशन दाखल झाली नव्हती. सर्वात पहिले स्थायी समितीने आदेश दिले होते. स्पेकचे ऑडिट झाले. मुख्यलेखाधिकारी शासनाकडुन आणण्यात आले. विधी सल्लागार यांनी खुलासा करावा की, करार रद्द झाल्यानंतर रिट पिटीशन दाखल झाली की, नंतर झाली खुलासा करण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा : रिट पिटीशन अगोदर दाखल झाले असेल तर आपण मा.सभापती पदाचा राजीनामा देण्यात यावा नाही तर मी राजीनामा देईल.

श्री.रविकांत गवळी : स्पेक संदर्भात स्थायी समिती व सर्वसाधारण सभेत चर्चा झाली.

मा.सभापती : स्पेक संदर्भात सर्वांत प्रथम ऑडिट करण्याचे स्थायी समितीने आदेश दिले आहे. मुख्य लेखापरिक्षक यांनी ऑडिट केले आणि ऑडिट आल्यानंतर मा.आयुक्त श्री.बंड साहेबांनी काय आदेश दिले. मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल झाल्यानंतर महानगरपालिकेने काय म्हणने मांडले खुलासा करण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी : स्थायी समितीमध्ये चर्चा झाल्यानंतर स्थायी समितीने श्री.जाधव यांना चौकशीसाठी नेमले होते त्या अहवालाबाबत काय झाले.

मा.सभापती : रिट पिटीशन सन 2009 मध्ये दाखल झालेले आहे रिट पिटीशन 2040/2009 अशी आहे. विधी सल्लागार यांनी खुलासा दयावा की, स.स.श्री.प्रशांत देसरडा यांनी रिट पिटीशन केव्हा दाखल केले.

सहा.विधी सल्लागार : स.स.श्री.प्रशांत देसरडा यांनी दिनांक 09 एप्रिल 2009 रोजी रिट पिटीशन दाखल केले.

मा.सभापती : मा.आयुक्त श्री.बंड साहेबांनी केव्हा आदेश काढले. मुख्य लेखापरिक्षक यांनी स्पेकचे ऑडिट केले त्यारिपोर्टवर मा.आयुक्त श्री.बंड साहेबांनी काय लिहिले. त्यामुळे करार रद्द झाला काय?

श्री.रविकांत गवळी : श्री.जाधव व श्री.अरब साहेबांनी जी चौकशी केली मा.श्री.बंड साहेबांना जो अहवाल सादर केला त्या अहवालावर स्पेक रद्द केला.

मा.सभापती : ज्यावेळी स.स.श्री.प्रशांत देसरडा यांनी रिट पिटीशन दाखल केली त्यादिवशी सभागृहाची निवडणुक होती. एप्रिल 2009 रोजी दुसऱ्यावेळेस सभापती म्हणुन निवडुन आलो.

श्री.प्रशांत देसरडा : कंपणीचा करार केव्हा रद्द केला. गेल्या दिड वर्षापासून प्रशासनाशी पत्र व्यवहार करतो आहे आणि त्याच्यानंतर माझ्याकडे कागदपत्र/डॉक्युमेंट तयार झाले.

सहा.विधी सल्लागार : यासंबधीचा जो चौकशी अहवाल आहे मुख्य लेखापरिक्षक श्री.जाधव साहेब यांनी केला आहे आणि त्यानंतर चौकशी अहवाल मुल्य निर्धारण अधिकारी यांचेकडे सादर केला.

श्री.रविकांत गवळी : दिनांक 09.04.2009 रोजी जे पिटीशन दाखल झाले त्याच्यापुर्वी करार रद्द झालेला होता काय?

सहा.विधी सल्लागार : टर्मिनेशन ऑर्डर करार रद्द करण्याचा दिनांक 21.05.2009 रोजी सादर झाली आहे.

मा.सभापती : पहिल्या नोटीसमध्ये करार रद्द केला काय? की यापुर्वी नोटीस दिली होती.

सहा.विधी सल्लागार : दोन नोटीस दिलेल्या आहे. प्रशासनाकडुन सुरवातीस दोन नोटीस देण्यात आलेल्या आहे. दिनांक 07.03.2009 रोजीच पहिल्या नोटीस मध्ये टर्मिनेशन करण्यात येणार आहे. पिटीशन एप्रिल 2009 मध्ये दाखील झाले.

मा.सभापती : दोन नोटीसाच्या सुचना देवून करार रद्द केला आहे. उच्च न्यायालयाचा आदेश आहे डिसमीस करा म्हणून.

श्री.प्रशांत देसरडा : डिसमीस कोणत्या बेसवर ते मी मान्य केले, जे माझे पाच मुद्दे होते ते महानगरपालिका पुर्ण करेल, गुन्हा दाखल करेल असे अफ्युडेविट दिल्यानतर मी ॲग्री केले.

मा.सभापती :त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश हायकोर्टात प्रशासनाने अगोदरच दिलेले आहे. जो पर्यंत स्थायी समितीने मुख्य लेखापरिक्षक श्री.जाधव यांनी स्पेक बाबत पुर्ण ऑडिट केले आहे. स्पेकच्या चुकामुळे महापालिकेचे किती नुकसान झाले आहे ते अहवाल आहे त्यानुसार महानगरपालिकेने तात्काळ कारवाई करून तसे अंडरटेकींग हायकोर्टात दिले. आज श्री.जाधव बैठकीस हजर नाही याबाबत संपूर्ण माहिती केव्हा आदेश दिला स्थायी समितीने याबाबतची संपुर्ण माहिती स्थायी समितीला देण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : मा.आयुक्त बोलले. कोणतेही अधिकारी सक्षम नाही. गेल्या सहा महिण्यांपासून एका विषयावर पूर्ण माहिती घेत असतांना मा.आयुक्त शहर अभियंता, ADTP यांच्याकडुन पहाणी करून सदरील ले आउटला ताबडतोब स्थगीती देण्यात यावी. पुढील आदेशासाठी मा.आयुक्तांकडे संचिका गेली असता मा.आयुक्तांनी सांगीतले की, मला प्रत्येक पान बघावे लागेल, मा.आयुक्तांनी नंतर स्थळ पहाणी ठेवली स्थळ पहाणीमध्ये सहाय्यक संचालक नगर रचना, मा.आयुक्त व टाउन प्लॅनिंगचे सगळे अधिकारी गेले तेव्हा लक्षात आले की, हा चुकीचा लेआउट मंजूर करण्यात आला. त्यावेळी

त्यांनी तात्काळ बी.आय.ला सस्पेंड करा म्हणून ADPT ला आदेश दिला. त्याचे फॉलोअप झाले का? कारवाई झाली का?

शहर अभियंता : झवेरी ले आउट बाबत आपण कदाचित बोलत आहे, तिथे आयुक्त गेले असता शेजारी नाल्यावरती एक छोटेसे बांधकाम बंद स्थितीत आढळले, त्याच्या बी.आयवर कारवाई करण्याचे तिथे तोंडी सांगीतले होते.

श्री.रविकांत गवळी : सदरील बी.आयचे म्हणने आहे की, मी ADTP आणि प्रशासनाला मॅनेज केले आहे. मॅनेजचा अर्थ काय आहे. मला निलंबीत करण्याचे आदेश दिले होते परंतु संध्याकाळी प्रशासनास मॅनेज केले असे त्याचे म्हणने आहे. त्या लेआउटवरती जी चर्चा झालेली आहे त्याची अंमलबजावणी काय झालेली आहे याचाही खुलासा करण्यात यावा.

अति.शहर अभियंता : दोन वेगवेगळे विषय आहेत, एक अनाधिकृत बांधकामाचा आहे वॉर्ड अधिकाऱ्यांचा रिपोर्ट घेतलेला आहे अनाधिकृत बांधकाम केलेले आहे. त्यांना नोटीस देण्यात आलेली आहे आणि प्रशासनाने आदेश दिले आहे की, अनाधिकृत बांधकाम तोडण्यात यावे.

श्री.रविकांत गवळी : मा.आयुक्तांनी बी.आयला निलंबीत करा म्हणून सांगीतले होते काय?

श्री.रविकांत गवळी : दिनांक 8 तारखेला पाहणी करणार म्हणुन पत्र होते. सदरील ले-आउट धारकाला सुध्दा पत्र होते. ते पत्र आपण निर्गमित केले होते. माझ्याकडे लेखी पत्र असतांना आयुक्त स्पॉट व्हिजीट इथे गेले, असे असतांना प्रशासन म्हणते की, तोंडी आदेश मा.आयुक्तांचे पाळत नाही. त्यासंदर्भांत दोन तास चर्चा झाली त्यात काही तथ्य नाही का?

शहर अभियंता : याप्रकरणी संबधीताकडुन खुलासा घेतलेला आहे, वॉर्ड अधिकारी आणि वॉर्ड बी.आय ने खुलासा दिलेला आहे. तो सभागृहापुढे ठेवता येईल, आयुक्तांसमोर खुलासा ठेवलेला आहे. मा.आयुक्तांनी निलंबीत करण्याचे आदेश दिले असतेतर निलंबीत केले असते. संचिका मा.आयुक्तांसमोर ठेवलेली आहे.

मा.सभापती : संबधीत संचिकेवर निर्णय झालेला आहे का?

शहर अभियंता : मा.आयुक्तांसमोर संचिका ठेवलेली आहे.

मा.सभापती : मा.आयुक्तांची बदली झाल्यामुळे ते गेले आहे.

शहर अभियंता : संचिकेमध्ये काही निर्णय झालेला नाही,

मा.सभापती : मा.आयुक्तांनी खोटे सांगीतले काय? एक महिण्यापासून प्रशासनाकडुन काहीच कारवाई झालेली नाही. प्रशासनाने खुलासा करावा की तिथे अनाधिकृत काहीच नाही म्हणून.

शहर अभियंता : या प्रकरणी चौकशी केलेली आहे.

मा.सभापती : चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले ते सांगण्यात यावे.

शहर अभियंता : अहवाल मा.आयुक्तांना सादर केलेला आहेत.

श्री.रविकांत गवळी : प्रशासनाने पूर्ण अभ्यास करून संचिकेवर लिहिले की, सदरील लेआउटला ताबडतोब स्थगीती देण्यात यावी. सदरील कारवाई त्वरीत करण्यात यावी.

शहर अभियंता : मा.आयुक्तांकडे कारवाईसाठी पाठविल्यानंतर मा.आयुक्तांना मी म्हणू शकतो का की, ताबडतोब निर्णय घ्या किंवा स्वाक्षरी करा म्हणून.

श्री.रविकांत गवळी : सहाय्यक संचालकांची लेआउट देण्याचे आदेश काढले त्याची मान्यता घेण्यासाठी मा.आयुक्तांकडे गेलेत. मा.आयुक्तांनी स्पष्ट उल्लेख केला आहे की मी या गोष्टींना महत्व देत नाही संचिकेचे प्रत्येक पान बघावे लागेल.

शहर अभियंता : मा.आयुक्तांकडे अहवाल दिला आहे.

मा.सभापती : मा.आयुक्त बिल्डरला पाठीशी घालत आहे काय?

शहर अभियंता : त्यातील काही Finding आहे ते मांडलेले आहे.

श्री.रविकांत गवळी : एकीकडे आपण व्हिजन 25 करतो. व्हिजन 25साठी चारशे चारशे पाने खर्च करतो. त्याच्यावर बैठका घेतो. शहरात जे नाले आहेत त्याच्यावर मालकी कुणाची आहे.

मा.सभापती : मा.आयुक्तांनी अनेक प्रकारचे निर्णय घेतले मग हा निर्णय का नाही घेतला.

शहर अभियंता : येणारे मा.आयुक्त निर्णय घेतील.

मा.सभापती : लेआउटला स्थगीती आहे.

श्री.रविकांत गवळी : ले आउटला स्थगीती नाही आज रोजी बांधकाम चालू आहे.

मा.सभापती : श्री.डी.पी.कुलकर्णी यांचेकडे याबाबत काही माहिती आहे काय?

श्री.रविकांत गवळी : आज रोजी त्याच्यानंतर लेआउटवर एका विकासाने एका प्लॉटवर बांधकाम परवानगी मागीतली टाउन प्लॅनिंगच्या अधिकाऱ्यांनी सांगीतले की, सध्या सहा महिण्यांपासून या लेआटवर चर्चा चालू आहे.

मा.सभापती : सर्व्हे नंबर 61 सिटी सर्व्हे नं.15835 बांधकाम तात्काळ थांबविण्याचे प्रशासनाने आदेश दयावे. प्रशासनास मा.आयुक्तांचे आदेश पाहिजे की, सभापतींचे आदेश पाहिजे.

कार्यकारी अभियंता (श्री.पानझडे) : संचिका मा.आयुक्तांसमोर सादर करतो.

श्री.रविकांत गवळी : संचिका अंतिम आदेशाकरीता मा.आयुक्तांकडे आहे. आज रोजी तोंडी स्थगीतीचे आदेश दिला तर ते आपणांस मान्य होइल काय?

कार्यकारी अभियंता (श्री.पानझडे) : मा.आयुक्तांचे आदेश लागेल.

श्री.सतिष कटकटे : मा.आयुक्त, मा.शहर अभियंता यांनी स्थळ पहाणी केली आता त्यावर निर्णय देण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी : 28 मिटरचा नाला आपण डब करून टाकतो, त्यानंतर आपण 365 स्के. मि. जागा हस्तांतर करून घेतो. एकतर्फी हस्तांतरण झाल्यानंतर आज रोजी मालकी हक्काचे पुरावे सादर होत नाही. याबाबत पुर्ण विषयाची माहिती टाउन प्लॅनिंगला आहे. स.नं.61 संदर्भात आज चौकशीची गरज वाटत नाही. स्थगिती दिली तरी बांधकाम परवानगी थांबणार नाही.

मा.सभापती : स.नं.61 रेखांकना संबंधी चुक झाली असेल तर तात्काळ रद्द करण्याची कार्यवाही करावी व प्रशासकीय अधिकारी यांनी काम बंद करून अहवाल द्यावा.

श्री.रविकांत गवळी : 30 तारखेस अंदाजपत्रक सादर झाले 01 तारखेस आरसीएच मध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केले. आरसीएच प्रकल्प केंद्र शासना अंतर्गत की राज्य शासनाकडे तर्फे का महानगरपालिका अंतर्गत चालविला

जातो याचा खुलासा करण्यात यावा याच्यानंतर 10 वर्षापूर्वी जे कर्मचारी घेतले होते ते दैनिक वेतनावरती घेतले होते की, कायमस्वरूपी घेतले होते व काल जे आदेश दिले आहे ते कोणत्या अधिकारात दिले आहे याचा खुलासा करण्यात यावा.

सहा.आयुक्त-1 : सर्वसाधारण सभा दि.11.01.2007 विषय क्रमांक 655/4 यानुसार या कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवरती 01 एप्रिल 2007 नंतर घेण्यासाठी आपण ठराव पारीत केला.

श्री.रविकांत गवळी : शासनाचे आदेश 16.05.2008 रोजी आले त्यानुषंगाने आपण कारवाई केली. आरसीएचची ज्यावेळी भरती करून घेतली आज रोजी त्यांचे मानधन कुणाच्या अंतर्गत दिले जाते.

सहा.आयुक्त-1 : महानगरपालिका मानधन देते. 01.04.2007 नंतर महानगरपालिका देते.

श्री.रविकांत गवळी : ज्यावेळी आपण त्यांची नियुक्ती केली त्यावेळी दैनिक वेतनावरती होते की, कायमस्वरूपी होती.

सहा.आयुक्त-1 : ठराविक वेतनावरती नियुक्ती केली होती.

श्री.रविकांत गवळी : त्या कर्मचाऱ्यांना कायम करता येते.

सहा.आयुक्त-1 : ठराव घेउन केले आहे.

मा.सभापती : सर्वसाधारण सभेने नावासहीत प्रस्ताव मंजूर केलेला आहे काय?

सहा.आयुक्त-1 : जे कर्मचारी कार्यरत आहे शासनाने तशी मंजूरी दिली त्याला, या प्रकल्पात विहीत मार्गानी नियुक्त केलेले जे कर्मचारी आहे त्यांना कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करून घ्यावे. विहीत मार्गाने भरती केलेले सिनीरिटी प्रमाणे नियुक्त केले.

मा.सभापती : सुप्रिम कोर्टाचे जे आदेश आहे त्यानुसार आरसीएचच्या ज्या नेमणुका आहे त्या बेकायदेशिर आहे. सर्वसाधारण सभा Appointing authority आहे.

श्री.रविकांत गवळी : सुप्रिम कोर्टाच्या आदेशाबाबत खुलासा करण्यात यावा. सुप्रिम कोर्टाचा असा आदेश ARI 1806/2006 चा आदेश आलेला आहे.

(सुप्रिम कोर्टाचा आदेश मा.सहाय्यक आयुक्त-1 यांना दाखविण्या येतो.)

मा.सभापती : नावासहीत दिलेले आहे काय शासनाने. शासनाने नावासहीत दिलेले असेलतर आमचा काही आक्षेप नाही.

श्री.रविकांत गवळी : बजेटमध्ये तरतुद झाली आहे काय?

सहा.आयुक्त-1 : शासनाचा निर्णय वाचवून दाखविण्यात येतो.

श्री.रविकांत गवळी : नावासह ठराव आलेला आहे काय? आज त्यांचे वेतन कोण देणार आहे.

सहा.आयुक्त-1 : त्यांचे वेतन महापालिका देणार आहे.

श्री.रविकांत गवळी : आपण 54(1)ची समिती गठीत करतो त्यानुषंगाने सर्वसाधारण सभेमध्ये 655चा ठराव ठेवला त्यानंतर राज्यशासनाचे निर्देश आले त्यानुषंगाने नियुक्ती केली. मा.सर्वोच्च न्यायालयाचे 2006चे जे आदेश आहे त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे होते काय?

मा.सभापती : मा.सर्वोच्च न्यायालयाने स्पेशल आदेश दिलेले आहे की Back Door Entry नको.

सहा.आयुक्त-1 : Back Door Entry दिलेली नाही त्यांची वर्तमानपत्रात जाहिरात देवून मुलाखत घेवुन भरती केलेली आहे.

मा.सभापती : सर्वसाधारण सभेत नावासहीत ठराव का नाही ठेवण्यात आला.

श्री.रविकांत गवळी : आज सर्व दैनिक वर्तमानपत्रामध्ये न्युज होती की, कास्ट व्हेरिफिकेशन संदर्भात याचिका दाखल झाली आहे.

मा.सभापती : कास्ट व्हेरीफिकेशन करण्याचा स्थायी समितीला अधिकार आहे काय?

श्री.रविकांत गवळी : काल मा.आयुक्त गेले त्यांनी दोन लोकांना स्केल वाढवुन देण्यासंदर्भात 2002 ला एक विषय झाला होता सन 2007 ला त्याची मंजुरी झाली होती. त्यामध्ये स्पष्ट लिहुन घेतले होते की ईक्रीमेंट,प्रमोशन देण्यात येवु नये. कास्ट व्हेरिफिकेशनचा विषय आस्थापना अंतर्गत आहे आणि ते सेक्शन संबधीत अधिकाऱ्यांच्या नियंत्रणात आहे.

मा.सभापती : त्यांनी जे कागदपत्र दाखल केलेले आहे तो औरंगाबादचा इश्यु नाही. नाशिकच्या जात पडताळणी समितीचा विषय आहे.

श्री.रविकांत गवळी : न्यायालयात याचिका दाखल झालेली आहे महानगरपालिकेस नाटीस आलेली आहे.

मा.सभापती : महानगरपालिकेस नोटीस आलेली आहे काय खुलासा करण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी : सर्वसाधारण सभेमध्ये आरसीएच संदर्भात जी माहिती देणे गरजेचे होते, राज्य शासनाला माहिती देणे गरजेचे होते त्यापध्दतीने देण्यात आलेली नाही. सन 2006 मध्ये न्यायालयाचा निर्णय आलेला आहे.

मा.सभापती : दहा दहा वर्ष कार्यरत दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना का नाही कायम केले आरसीएच कर्मचाऱ्यांनाच का कायम केले गेले. सर्वसाधारण सभा जोपर्यंत नावासहीत मंजूरी देत नाही तोपर्यंत आदेश काढु शकत नाही असा कायदा आहे.

श्री.रविकांत गवळी : मा.आयुक्त साहेबांना जी माहिती दिली गेली पाहिजे ती दिली जात नाही. सर्वसाधारण सभेमध्ये 655 चा ठराव ठेवला त्यानंतर सन 2005 मध्ये राज्यशासनाचे निर्देश आले त्यानुषंगाने नियुक्ती केली. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णय आलेला आहे त्याचा विषय नाही.

मा.सभापती : आरसीएचमध्ये ज्या 32 लोकांची नेमणुक झालेली आहे. याप्रकरणी मुख्यलेखापरिक्षक श्री.जाधव साहेब यांचेकडुन सविस्तर ऑडिट करून 15 दिवसांत अहवाल मागविण्यात येईल. श्री.जाधव साहेब आज नसल्यामुळे मा.प्र.आयुक्त श्री.घुगे यांनी तसे आदेश काढुन निर्गमित करावे व 15 दिवसांत अहवाल देण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी : वर्तमानपत्रात सहाय्यक आयुक्तां संदर्भात कास्ट व्हेरिफिकेशन संदर्भात विषय आलेला आहे. सर्व कर्मचाऱ्यांचा अधिकाऱ्यांचा अहवाल त्यांच्याकडेच असतो. त्या संचिकेमध्ये फेरबदल होउ शकतो. यासंदर्भात महानगरपालिकेला नोटीस आलेली आहे दिनांक 7 तारखेस हेअरिंग आहे.

मा.सभापती : सर्वोच्च न्यायालय निर्णय देईल. प्रशासनाने खुलासा करावा की, याबाबत न्यायालयाने आदेश दिलेला आहे काय?

सहा.विधी सल्लागार : सदरील विषयी मा.उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका दाखल झाल्याची नोटीस आलेली आहे. आदेश आलेला नाही.

श्री.रविकांत गवळी : फेरबदल होण्याची शक्यता आहे.

मा.सभापती : मा.उच्च न्यायालयाने काही आदेश दिल्यास पण पुढे जाईल. मा.उच्च न्यायालयाचा निर्णय होऊ द्या.

श्री.सिताराम सुरे : वॉर्ड ब अधिकारी श्री.सुर्यवंशी यांना गेल्या पाच महिण्यापासून सांगत आहे त्यांचे म्हणणे असे आहे की, कचरा उचलण्याच्या गाडया बंद केल्या असल्यामुळे कचरा उचलता येत नाही.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता (श्री.कुलकर्णी) : नविन दोन गाडयांचे आदेश कालच काढण्यात आलेले आहे.

श्री.सिताराम सुरे : गाडया कमी केलेल्या आहे त्यामुळे कचरा उचलण्यास विलंब होत आहे. एखादे घर बांधकामच झालेले नसेल तर अभय योजेने अंतर्गत नियमित करता येते का? असे तिन ते चार प्रकरण माझ्या वार्डात आहे. सदरील अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती : या प्रकरणी मा.आयुक्तांनी जातीने लक्ष घालुन वॉर्ड अधिकारी श्री. सुर्यवंशी यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी. सदरील अधिकारी 15 दिवसांच्या रजेवर आहे आल्यानंतर मा.आयुक्त कारवाई करतील. वॉर्ड अधिकाऱ्यांना किती वर्ष झालेले आहे वॉर्ड ब मध्ये खुलासा करण्यात यावा.

सहा.आयुक्त-1 : श्री.दिलीप सुर्यवंशी मागील 3 वर्षापासून त्या झोन मध्ये कार्यरत आहे.

मा.सभापती : त्या वॉर्ड अधिकाऱ्यांना 3 वर्ष झाले असेल तर त्यांची तात्काळ बदली करण्यात यावी.

श्रीमती सफिया मोमीन : स्पिलवर्कचे जे शिल्लक काम आहे त्याचे शॉर्ट टेंडरचे आदेश देण्यात यावे. ज्याचे टेंडर झाले आहे त्याचे वर्कऑर्डरचे आदेश देवून काम सुरू करण्यात यावे.

श्री.सतिष कटकटेः महानगरपालिकेने काही दुकानांचे ऑक्शन काढलेले आहे. कबाडीपुरा शॉपींग सेंटर येथील दुकान 1 आणि 2 नंबरचे शॉप देण्यात आले का? त्याचीही जाहिरात काढण्यात आली आहे का?

मा.सभापती : मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

मालमत्ता अधिकारी :कबाडीपुरा नाल्यावरील बाबादर्गा समोरील जी दुकाने आहेत तिथे महानगरपालिकेचे गाळे आहेत त्यापैकी गाळे क्रमांक 2, 6, 9, 10, 13, 14, 16, 17, 3 आणि 4.

श्री.सतिष कटकटे : कबाडीपुरा, बुढ्ढीलेन येथील दोन दुकाना पुर्वी कुणाला दिलेल्या आहे का खुलासा करण्यात यावा, दिलेल्या असेल तर पुन्हा पेपरमध्ये जाहिरात दिली आहे का?

मालमत्ता अधिकारी : जी रिक्त दुकाने आहेत त्याची जाहिरात दिलेली आहे.

श्री.सतिष कटकटे : यापुर्वी पैसे भरून कुणाला दिलेली आहे का?

मालमत्ता अधिकारी : ऑक्शन झाले होते, काही लोकांनी रेट कमी-जास्त झाल्यामुळे मा.स्थायी समितीने तो पूर्ण टेंडर रद्द केलेले आहे आणि टेंडर रिकॉल करण्याचे आदेश दिले आहे.

श्री.सतिष कटकटे : ज्यालोकांनी ज्यावेळी ऑक्शन झाले,ऑक्शनची बोली बोलली त्यावेळी प्रशासनाच्या रेट पेक्षा जास्त बोली बोलली का.

मालमत्ता अधिकारी : जास्त बोली बोलल्याचा प्रस्ताव मागच्या वेळेस मा.स्थायी समितीत ठेवला होता. मा.स्थायी समितीने प्रस्ताव रद्द केलेला आहे.

श्री.सतिष कटकटे : त्यालोकांचे डिपॉजिट रक्कम जमा आहे का?

मालमत्ता अधिकारी : जे पैसे जमा होते ते अनामत रक्कम परत घेवून जाण्यासाठी प्रत्येकांना पत्र दिलेले आहे. तसे स्टेटमेंट लेखा विभागात पाठविलेले आहे.

श्री.सतिष कटकटे : ऑक्शन पेक्षा जास्त बोली बोललेली आहे असे सभागृहास सांगीतले का?

मा.सभापती :सदरचा प्रस्ताव केव्हा रद्द केलेला आहे.

मालमत्ता अधिकारी : स्थायी समिती सभा दिनांक 21.10.2008 रोजीच्या इतिवृत्ता नुसार रद्द झालेले आहे.

मा.सभापती : दिनांक 21.10.2008 नंतर प्रशासनाने कुठली कारवाई केली.

मालमत्ता अधिकारी : स्थायी समितीने आदेश दिले की, रद्द करण्यात यावे आणि वैधानिक कार्यवाही करावी त्यानुसार संबधीतांचे अनामत रक्कम परत करण्याचे लेखी पत्र दिलेले आहे.

मा.सभापती :स्थायी समितीने असे आदेश दिले का, की यानंतर यापुर्वी कुणालाही दुकाना देवू नये किंवा दहा महिण्यानंतर प्रस्ताव स्थायी समितीपुढे आणू नये. कार्यालयातील काही लोकांना दहा रूपयांच्या फरकाने दुकाने दिली होती का? स्थायी समितीकडे रद्द करण्यासाठी प्रस्ताव आला होता का? महानगरपालिकेच्या कोणकोणत्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांचे नांवे दुकाने देण्यात आली आहेत?

मालमत्ता अधिकारी :तत्कालिन मालमत्ता अधिकाऱ्यांनी सदरचा प्रस्ताव ठेवला होता.

मा.सभापती : महानगरपालिकेचे कर्मचारी त्यामध्ये आहे का, स्थायी समितीने 21.10.2008 रोजी प्रस्ताव रद्द केला होता. तो तात्काळ आणला असता तर दोन ते अडीच लाखांचा फायदा महानगरपालिकेला झाला असता. नऊ महिने महानगरपालिकेचे उत्पन्नाचे नुकसान केले आहे. दहा महिने प्रस्ताव उशीराने का आला?

मालमत्ता अधिकारी : वेळोवेळी सादर केले आहे. दोन फेब्रुवारीनंतर तिन महिने आचारसंहितेत गेला आणि नंतर मा.आयुक्त रजेवर गेले होते.

मा.सभापती : सहा महिने आचारसंहिता होती काय? यास कोण जबाबदार आहे?

मालमत्ता अधिकारी : प्रशासनाने वेळोवेळी प्रस्ताव सादर केले होते. परंतु उपआयुक्त (सिडको) हे महिनाभर रजेवर होते त्यानंतर मालमत्ता विभागाचा चार्ज कर निर्धारक व संकलक यांचेकडे गेला. परंतु पॉलीसी मॅटर आमच्या समोर आणू नका म्हणुन सांगितले.

मा.सभापती : महानगरपालिकेस उत्पन्न मिळवुन देण्याचे काम अधिकाऱ्यांचे आहे का नाही.

मालमत्ता अधिकारी : प्रशासनाकडे वेळोवेळी प्रस्ताव सादर केले होते.

मा.सभापती : जे प्रस्ताव स्थायी समितीचा होता त्यामध्ये कार्यालयाचे अधिकाऱ्यांचे पत्नीचे नांव, भावाचे नांव आहे ते वगळून सर्वांना दुकान देण्याचा प्रस्ताव पुढील स्थायी समितीमध्ये सादर करा. या संदर्भात आता काढलेल्या निविदा स्थगित करण्यात येतात.

मा.सभापती : दारीद्ररेषेच्या सर्व्हे विषयी खुलासा करण्यात यावा.

प्रकल्प संचालक
(श्री.सुर्यवंशी) : संशोधन केंद्रामध्ये दारिद्ररेषेखालच्या कुटुंबाचे अर्ज प्राप्त झाले होते ते 31.07.2008 पर्यंत अर्ज घेण्यात आले त्यात एकुण 32 हजार अर्ज प्राप्त झाले आणि त्या अर्जावर मा.आयुक्तांच्या परवानगीनुसार सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात आलेले असून वॉर्ड इ.ड,ब.क मध्ये शाहूनगर, कैलासनगर,मिसरवाडी आणि किराडपुरा येथे दोन तारखेपासून सर्वेक्षणाचे काम सुरू झालेले आहे आणि वॉर्ड अ आणि फ मध्ये सोमवारपासून सर्वेक्षणाचे काम सुरू होणार आहे.

श्री.रविकांत गवळी : प्रकल्प संचालक यांनी खुलासा केलेला आहे शहरात एकुण 53 झोपडपट्टया आहेत एकुण अर्ज 32 हजार आलेले आहे. दोन तारखेपासून चार प्रभागामध्ये काम सुरू केलेले आहे आणि दोन प्रभागामध्ये सोमवार पासून काम सुरू करत आहे. शहराचे क्षेत्रफळ बघितले असता त्यांच्याकडे गाडी नाही. यापुर्वी प्रकल्प संचालक यांचेकडे गाडी होती.

मा.सभापती : दारिद्ररेषेचे काम अत्यंत महत्वाचे आहे प्रशासनाकडुन त्यांना तात्काळ गाडी/जीप उपलब्ध करून द्यावी.

राष्ट्रगीता नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद